अंक ५२ वा वर्ष ५६ वे

# विनयन

नियतकालिक : २०२१-२२



खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे

## शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

(NAAC Reaccredited 'A' Grade)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
जयंती कार्यक्रमात बोलताना
प्रा. संदिप केदार





डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती
कार्यक्रम

विद्यापीठाच्या अध्यादेश १८१
अंतर्गत कौशल्याभिमूख
प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील
अत्तीर्ण विद्यार्थी






अंतर्गत मुल्यमापन चाचणी

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

# विनयन

## नियतकालिक २०२१-२०२२

: प्रकाशक :

**प्राचार्य डॉ. अशोक राणे**

**उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी**

**प्रा. निलेश जोशी**

: संपादक :

**प्रा. स्वाती चव्हाण**

**प्रा.पंकज पाटील**

: विद्यार्थी प्रतिनिधी :

**पाटील हर्षदा अशोक**

**शिंदे गायत्री अशोक**

: छायाचित्र :

**मोहन चौधरी, विजय चव्हाण**

: मुद्रक :

**अथर्व पब्लिकेशन्स्**

शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,

तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१. **संपर्क :** ९४०५२०६२३०

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अंतरंग


| अ.न. | नाव | विषय | |
|---|---|---|---|
| १ | पाटील ज्योत्स्ना गोकुळ | आजादी का अमृत महोत्सव | १३ |
| २ | स्वाती धनंजय सोनवणे | Be. Positive Be Happy | १४ |
| ३ | सारिका शंकर बंगाळ | साने गुरुजी | १६ |
| ४ | लोकेंद्रनाथ नरेंद्र खांजोडकर | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | १७ |
| ५ | प्रियंका पद्माकर चौधरी | हक और आजादी | १८ |
| ६ | धनश्री गजानन माळी | हीच खरी सत्ता आमची | १९ |
| ७ | कीर्ती देविदास पवार | आदरणीय वडील | २० |
| ८ | प्राची किशोर भोई | 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' | २१ |
| ९ | सोनाली मधुकर साळुंखे | 'भारताच्या अखंडतेत शिक्षकांचे योगदान' | २२ |
| १० | तेजश्री ताराचंद आहिरे | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | २४ |
| ११ | सरिता प्रकाश इंगळे | जयघोष कर | २५ |
| १२ | चेतना काळे | जागतिक महिला दिन | २६ |
| १३ | चेतना मधुकर वानखेडे | विषय मराठी भाषा संवर्धन काळाची गरज | २७ |
| १४ | गायत्री शिंदे | मराठी असे आमची मायबोली | ३० |
| १५ | चारुशीला खैरनार | डिजिटल भारत | ३१ |
| १६ | प्रग्या तोलाराम दुगर | The role of teacher in care of environment | ३२ |
| १७ | प्रा. प्रविण कोल्हे | दि. ५ मार्च २०२१ या दिवशी मास्क वाटप इ गुलाब पुष्प वाटप अभियान राबविण्यात आले | ३३ |
| १८ | | केसीईच्या शिक्षणशास्त्र व शा. शि. महाविद्यालयात युवा स्वास्थ अभियानास प्रारंभ | ३४ |
| १९ | | जागतिक एड्स दिन | ३५ |
| २० | | के. सी. ई. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शहीद दिना निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन | ३६ |
| २१ | | आजादी का अमृत महोत्सव जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल रॅली आयोजन | ३७ |
| २२ | डॉ. शैलजा भंगाळे | जागतिक दिव्यांग दिन | ३८ |
| २३ | | हिंदी दिन | ३९ |
| २४ | | अहवाल विभाग | ४० |
| २५ | | IQAC- 2021-22 | ४१ |
| २६ | | महिला लैंगिक छळ निवारण कक्ष | ४१ |
| २७ | | संशोधन केंद्र २०२१-२२ | ४२ |

| | | |
|---|---|---|
| २८ | महिला लैंगिक शोषण तक्रार निवारण समिती | ४२ |
| २९ | शैक्षणिक वर्ष २०२१–२२ चा अहवाल | ४३ |
| ३० | Student Council for Work 2021-22 | ४५ |

## अध्यक्षांचे मनोगत...



खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात एकूण ५७ वर्षांची उज्वल शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा व शैक्षणिक गुणवत्ता यांचे नियमित संवर्धन होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जातो. यासाठी व्यवस्थापन परिषद सातत्याने मार्गदर्शन करून नियंत्रण करीत आहे. शासनाच्या आणि विद्यापीठाच्या सर्व योजनाचा महाविद्यालयात लाभ मिळण्यासाठी प्राचार्य आणि सर्व शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी सतत कार्यरत असतात. यामुळे महाविद्यालयाचे एनसीटीई आणि NAAC या संस्थेकडे नियमित अहवाल सादर केलेले असून शिक्षणाचा दर्जा सतत उंचावत राहण्यासाठी सर्व स्टाफ कार्यमग्न असतो.

या महाविद्यालयात बी.एड.,एम.एड., बी.पी.एड. आणि एम.पी.एड. या शिक्षणक्रमांचे अध्यापन केले जाते. तसेच शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता आहे. आजपर्यंत ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. तसेच अनेक विद्यार्थी संशोधन करीत आहे. या महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा खेळ आणि क्रीडा क्षेत्रात विविध कौशल्य विकसित करण्यासाठी संस्थेने एकलव्य क्रीडा संकुलाची उभारणी करून खेळासाठी अद्ययावत सुविधा उपलब्ध केल्या आहेत. महाविद्यालयात खेळातील कौशल्य विकसित होण्यासाठी विद्यापीठ मान्यता प्राप्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले आहेत. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी फी सवलत घेऊन सदर प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

राष्ट्रीय स्तरावर नवनवीन शैक्षणिक विषयांवर महाविद्यालयात राष्ट्रीय व विद्यापीठ स्तरावरील परिषदांचे व चर्चासत्रांचे नियमित आयोजन केले जाते. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात शैक्षणिक विचारांचे आदान-प्रदान होते. तसेच हुशार व गरजू विद्यार्थ्यांना संस्थेच्या स्तरावर शिष्यवृत्ती देऊन आर्थिक मदत केली जाते, तसेच सवलतीच्या दरात वसतिगृहाची सुविधा दिली जाते. महाविद्यालयातील विद्यार्थी दरवर्षी विद्यापीठ परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकतात. त्यामुळे दरवर्षी विद्यार्थ्यांमध्ये प्रवेश घेण्यासाठी स्पर्धा असते. महाविद्यालयाच्या विनयन वार्षिक अंकास शुभेच्छा !!!

**– प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे**

अध्यक्ष, के.सी.ई.सोसायटी, जळगाव



## प्राचार्यांचे मनोगत...

प्रिय विद्यार्थी मित्रहों,

खान्देश कॉलेज एयुकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नियतकालिक 'विनयन' प्रकाशित करताना आनंद होत आहे. आपल्या महाविद्यालयाला ५७ वर्षे पूर्ण झालेली आहे. महाविद्यालयाचे व्हीजन ''यावजीवम्मधिते विप्र:'' असे आहे. प्रत्येक शिक्षकाने आजीवन शिक्षण सुरु ठेवून ज्ञानदान करीत जावे असा बोध आपणाला घेता येईल. महाविद्यालयाचे मिशन "To impart relevant quality training programmes of education to students to make them knowledgeable, competent skillful teachers for the emerging society." असे आहे. यातुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून सुजाण, कार्यक्षम आणि कुशल शिक्षक तयार करण्याचा सतत प्रयत्न असतो. यासाठी व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष मा.नंदकुमार बेंडाळे व व्यवस्थापन मंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत असते.

मा. न्यायमूर्ती वर्मा आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार संपूर्ण देशात एन.सी.टी.ई. रेग्युलेशन ॲक्ट २०१४ नुसार या वर्षापासून बी.एड., एम.एड., बी.पी.एड. या शिक्षणक्रमांचा कालावधी दोन वर्षाचा झाला आहे. कार्यक्षम व गुणवत्तापूर्ण शिक्षक तयार होण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमात अमूलाग्र बदल झाला आहे. त्यात योग, कला आणि संगीत शिक्षण तसेच आंतरवासिता उपक्रम यासारख्या नविन आशयज्ञानाचा समावेश अभ्यासक्रमात झालेला आहे. त्यामुळे शिक्षक होण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या विद्यार्थ्यांनीच या शिक्षणक्रमात प्रवेश घेतला आहे या दोन वर्ष अभ्यासक्रमाची फलश्रुती भविष्यात निश्चितच दिसेल.

या वर्षात बी.एड्. शिक्षणक्रमास एकूण १५५, एम.एड., ११ बी.पी.एड.६१ आणि एम.पी.एड्.ला ३१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला असून प्रथम वर्षाचा या सर्व प्रथम वर्षाचा निकाल सरासरी ८२ टक्के पेक्षा जास्त आहे. एस.वाय.एम. पी.एड. विभागांचा निकाल ९० टक्के, एम.एड.चा निकाल ८९% बी.पी.एड. चा निकाल ७७% आणि एम.पी.एड. चा निकाल ७२% लागला आहे.

महाविद्यालयाच्या संशोधन विभागातंर्गत ३ प्राध्यापकांनी संस्था पातळीवर संशोधन प्रकल्प हाती घेतले आहे. तसेच महाविद्यालयातील पीएच.डी. मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी.पदवी प्रदान झालेली आहे. वर्षभरात महाविद्यालयात विविध मान्यवर प्राध्यापकांनी नैमित्तिक भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलेले आहे. तसेच शासनाचे, विद्यापीठाचे, यु.जी.सी. कडून आलेल्या पत्रानुसार विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे व क्रीडा स्पर्धांचे यशस्वीरित्या आयोजन करून संबंधीत विभागांना अहवाल सादर केलेले आहे.

'As The Mind so The Man' या तात्वि व सात्विक विचारसरणीनुसार प्रत्येक विद्यार्थी आणि शिक्षकाने आहार, विहार आणि विचारांचे आचरणात पालन केल्यास सक्षम, सुजाण नागरिक निर्माण होण्यास मदत होते. म्हणून प्रत्येकाने आपल्या मनावर अधिराय प्रस्थापित करता यावे यादृष्टीने कर्तव्य निष्ठेची जाणीव ठेवून संयमी जीवन जगले पाहिजे. त्यासाठी सदैव मन प्रसन्न ठेवून आचरण केले पाहिजे.

विनयन नियतकालिकाच्या या अंकासाठी लेखन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे मनापासून अभिनंदन करतो व विनयन या नियतकालिकास हार्दीक शुभेच्छा देतो.

**डॉ.अशोक रामचंद्र राणे,** प्राचार्य

# संपादकीय

संपादकीय.....

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

आज आपल्या महाविद्यालयाच्या 'विनयन' या नियतकालीकेच्या प्रकाशनाप्रसंगी विविध ज्ञान पुष्पांच्या एकत्रीकरणाचे फलीत झाल्याचा अनुभव प्रत्ययास येतो. खरचं शिक्षक निर्मितीत अत्यावश्यक आणि पोषक असा अभ्यासक्रमातून उद्याचे साकारणारे शिक्षकांचे लिखाण आणि मते मांडण्याचे प्रशिक्षण देण्याचा अनुभव हा या नियतकालिकेच्या प्रकाशन प्रसंगी आम्हास येतो. शिक्षकास आपली मते ठामपणे आणि वस्तुनिष्ठ तथ्यांच्या आधारे मांडता आली पाहिजे तसेच त्यांचा नव विचारांचा उदय व्हावा आणि शिक्षण क्षेत्रात गुणवत्ताधिष्ठित शिक्षक वर्गाची वाढ व्हावी हा हेतू मनाशी बाळगून 'विनयन' साकारले जाते.

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील नॅक पुन मूल्यांकनामुळे महाविद्यालयीन वातावरण जरा जास्तच व्यस्त झालेले होते. उद्याच्या होणाऱ्या भावी शिक्षकांसाठी हा अनुभव निश्चितच मोलाचा आणि महत्त्वपूर्ण ठरेल यात शंकाच नाही. महाविद्यालयात असलेल्या सर्व प्राध्यापकांच्या गुणवत्तेत अधिक भर पडली. त्यातच उत्पन्न होणारा विद्यार्थ्यांचा उत्साह हा आम्हास सदैव पोषक ठरला.

विद्यार्थ्यांना क्षेत्र भेट, राष्ट्रीय सेवा योजनेतून समाजकार्य, विविध सांस्कृतिक कार्यक्रम सहभाग, क्रीडा स्पर्धा यातून सहभाग नोंदविणे प्राचार्यांनी भाग पाडले.

सर्वगुण संपन्न असलेल्या शिक्षकांच्या बुद्धिमत्तेची ओळख मुखपृष्ठातुन दाखवण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे. विनयनच्या माध्यमातून तुमच्यातील सृजनशीलतेस एक संधी उपलब्ध करून दिलेली आहे. विनयन साठी आपला प्रतिसाद उत्साहवर्धक होता आपल्या सप्तरंगी साहित्याने अल्पावधित विनयनरूप इंद्रधनुष्य गोफण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

या अंकाच्या पूर्ततेसाठी आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे सर, उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी आणि प्रा. निलेश जोशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व सहकारी प्राध्यापक वृंदानी मदत केली. या सर्वाचे मनपूर्वक आभार. सर्व विद्याथ्र्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आम्हा सर्वांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा! धन्यवाद!

संपादक

**प्रा. डॉ. स्वाती वसंतराव चव्हाण**

**प्रा. पंकज रविंद्र पाटील**

| 2021-2022 (Result) | | | |
|---|---|---|---|
| **B.Ed.** | | | |
| 1) | Neha Mahajan | 9.67 (CGPA) | 1782 (Mark) |
| 2) | Jayashri Talele | 9.78 (CGPA) | 1776 (Mark) |
| 3) | Poonam Firke | 9.67 (CGPA) | 1775 (Mark) |
| **M. Ed.** | | | |
| 1) | Shital Patil | 10.00 | 695 |
| 2) | Mayara Khare | 9.88 | 671 |
| 3) | Ratnamala Sonawane | 9.65 | 671 |
| **B.P. Ed.** | | | |
| 1) | Sakshi Jaiswal | 9.77 | |
| 2) | Ravindra Patil | 9.70 | |
| 3) | Sayyad Irteka | 9.66 | |
| **M.P. Ed.** | | | |
| 1) | Ishwari Chavan | 9.84 | |
| 2) | Anuradha Kamthe | 9.75 | |
| 3) | Sushma Patil | 9.75 | |

# आजादी का अमृत महोत्सव

– पाटील ज्योत्स्ना गोकुळ

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या महान नेत्यांनी क्रांतिवीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले अशा सर्वांना वंदन.

'भारत माझा देश आहे'
'सारे भारतीय माझे बांधव'

अशा प्रतिज्ञा आपण अभिमानाने आणि गर्वाने करतो. ही प्रतिज्ञा आपण आज म्हणू शकतो कारण आपल्या महान नेत्यांनी, क्रांतिवीरांनी ब्रिटिशांशी लढून आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भारतातील हजारो शूरवीरांनी अथक संघर्ष करावा लागला होता.

'गुण रहा है दुनिया मे भारत का नगाडा,
चमक रहा आसमान मे देश का सितारा,
आजादी के दिन आओ मिलकर करे दुआ,
बुलंदी पर लहराता रहे तिरंगा हमारा!'

आपण सर्वजण खूप नशीबवान आहोत की स्वतंत्र अशा भारत देशामध्ये आपला जन्म झाला आहे. त्या शूरवीरांच्या बलिदानामुळेच आपण आज शांत आणि सुंदर आयुष्य जगत आहोत. आजचा सुवर्णकाळ आपण इथे आनंदाने साजरा करत आहोत. कारण आपल्या देशाचे वीर जवान तिकडे सीमेवरती स्वतःचा जीव धोक्यात घालून शत्रूशी सामना करत आहेत. या सैनिकांना माझा सलाम व माझे पती सुद्धा एक भारतीय सैनिक आहेत. भारताच्या सैन्यदलात ते  कार्यरत आहेत. व मोलाची कामगिरी करत आहेत.

दिवसेंदिवस देश प्रगतीपथावर जात आहे. परंतु समाजात गुन्हेगारी, भ्रष्टाचार, गरिबी आणि अस्वच्छता याचे प्रमाण वाढत आहे. भारताचे एक सुजाण नागरिक म्हणून देशाच्या विकासासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. वाईट लोकांपासून आणि वाईट गोष्टींपासून आपण आपल्या देशाचे संरक्षण केले पाहिजे. सर्वांनी एकत्र येऊन एकजुटीने काम करून भारत देश जगातील सर्वोत्कृष्ट देश बनवणे हे आपले कर्तव्य आहे.

स्वातंत्र्याच्या जल्लोषाचा,
महिमा हा आगळा,
अमृत महोत्सवी वर्षात
साजरा करून उन्नतीचा सोहळा स्वातंत्र्याचे जतन करूया त्यागाचा मार्ग धरू वेगळा !!

जय हिंद जय महाराष्ट्र जय भारत.

# Be. Positive Be Happy

**– स्वाती धनंजय सोनवणे**

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले ते १५ ऑगस्ट १९४७ रोजी यावर्षी भारताला स्वतंत्र होऊन ७५ वर्षे पूर्ण झाली.

आपल्या भारत देशाला ब्रिटिशांकडून स्वतंत्र मिळवून देण्यासाठी आपल्या भारतीयांनी त्या काळात खूप प्रयत्न केले, म.... त्यामध्ये पुरुषांचा पण वाटा होता आणि स्त्रियांचा पण, त्या काळात आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी या लोकांना खूप त्रास, यातना, काहींना तर आपला जीव धोक्यात टाकून आपल्या मातृभूमीसाठी वीर बलिदान देऊन या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

आता ही आपल्या भारत देशाचे संरक्षण करण्यासाठी आपल्या भारत देशाचे सैनिक दिवस-रात्र एक करून आपल्या भारताचे आपल्या भारतीय सीमांचे रक्षण करीत आहेत आणि वेळ आली तर त्यांना आपले प्राण सुद्धा या आपल्या भारत देशाच्या संरक्षणासाठी गमवावे लागतात. आपल्या भारत देशाचे सैनिक आपल्या जीवाची परवान करता आपल्या देशाच्या आरक्षणासाठी वीर बलिदान देतात. तरीही... आजच्या आपल्या या नवीन पिढीला काहींना असे वाटते की आम्हाला स्वतंत्र नाही. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त आमच्या महाविद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रम मध्ये माझ्या अनेक मित्र-मैत्रिणींना संभाषणामध्ये भाग घेतला होता.

त्या संभाषणांमध्ये माझी मैत्रिणीने असे मत केले की, स्वतंत्र मिळवणे आज स्वातंत्र आहोत असं भासत नाही आपण पिण्याच्या पाणपोई आपला पिण्याचा ग्लास सुद्धा साखळी दंडाने बांधलेला आपल्याला दिसतो. त्या क्लास कडे बघून आपल्याला असे वाटते की तो ग्लास किती सुरक्षित राहू शकत नाही तर आपण स्वातंत्र्य नाही.

माझ्या मित्र-मैत्रिणींना असे सांगायचे आहे की, अरे मित्रांनो, आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कित्येकांनी यातना सहन केल्या, स्वतःचा जीव धोक्यात टाकून, स्वतःचे प्राण म्हणून त्यांनी या भारत देशाला स्वातंत्र मिळवून दिले.

आणि तुम्ही या साखळीने बांधलेल्या ग्लासाकडे बघून म्हणतात की... आपण स्वतंत्र आहोत असे वाटत नाही तर विद्यार्थी मित्रांनो येथे आपण आपल्या पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. आपले विचार आपण बदलून सकारात्मक दृष्टीने आपण पहिल्या आणि वागले पाहिजे.

जर पिण्याच्या पाणपोई वर स्टीलचा ग्लास स्वतंत्र ठेवून जर चोरीला जात असेल तर तिथे तुम्ही प्लास्टिकचा वाट ठेवा आणि तोही तिथून चोरीला जात असेल तर तुम्ही तेथे रेडिमेड बनवलेल्या जाड कागदाचे किंवा रॅपचे ग्लास ठेवू शकतात आणि तेही तेथून हवेने ओढून जात असेल तर, तुम्ही साध्या आणि सरळ मातीचा पिण्याचा पाण्याचा ग्लास लोटा ठेवून शकतात. म्हणजे तो तिथून कोणी चोरीलापण नेणार नाही आणि तो तेथून हवेने उडणार ही नाही. पण आपल्या पाहण्याचा दृष्टिकोन बदला आणि नेहमी सकारात्मक विचार करा.

उदा. दोन रेडिओवर गाणे वाजत आहेत त्यातल्या पहिल्या व्हिडिओवर एक गाणं वाजत आहे की, दुनिया मे हम आये है तो जीना ही पडेगा... आणि दुसऱ्या रेडिओवर गाणं वाजत आहे की, छोडो कल की बाते कल की बात पुरानी... मधून निवड करण्याची सकारात्मक कृती आपल्या मध्ये पाहिजे. जसं दुनिया मे आये हो तो जीना ही पडेगा या गाण्याला हे ऐकून तुम्ही उदासीनता, निराशा आणि सकारात्मक घडवलेले प्रयत्न न करता तुम्ही जगत राहणार का, की...

दुसऱ्या रेडीओ वरच गाण छोडो कल की बाते कल की बात पुरानी... या गाण्यावरून आपल्या जीवनातील भूतकाळात घडलेल्या दुःखदायक घटना काही नकारात्मक गोष्टी विसरून वर्तमानात आनंदाने आणि सकारात्मक वृत्ती ठेवून आपण जगलं पाहिजे.

तसेच माझ्या जीवनातील पूर्ण भारत देशाचा, जगाचा, विश्वाचा रियल हिरो म्हणजे कोण? हॉलीवुड का मराठी चित्रपट... नाही. तर या मृत्यू लोकांमध्येहे हिरो तर कधीन-कधी काळा नुसार याचं अस्तीत्व, यांची

लोकप्रियता ही हळुहळु नश्वर होणाराच आहे,... माझ्या जीवनातील रियल हिरो जो अनंत आहे. त्याच अस्तित्व काळानुसार कधीही नष्ट होणार नाही... तो म्हणजे पूर्ण भारताचा, जगाचा या विश्वाचा रियल हिरो तो म्हणजे माझे आराध्य दैव श्रीकृष्ण या श्रीकृष्णाच्या मूर्तीच्या चेहऱ्याकडे पाहून आपण काहीतरी शिकलो पाहिजे. ते म्हणजे श्रीकृष्णांनी आपले जीवन जगत असताना खूप काही गोष्टींचा त्याग केला.

उदा. श्रीकृष्णाने आपल्या आई वडील सोडले त्यानंतर नंद – यशोदाला मित्र निघून गेले... राधा निघून गेली गोकुळ सोडले आणि मथुराही सोडली. आयुष्यभर श्रीकृष्ण माझा गोविंद काही ना काही सोडतच गेला. श्रीकृष्ण आयुषभर त्याग केला. पण श्रीकृष्णाने एक गोष्ट ती कधी सोडली नाही ती म्हणजे त्याच्या चेहऱ्यावरचे सकारात्मक हसण्याची कला हे श्री कृष्णाने कधी सोडले नाही.

हे सांगतानाचा उद्देश असा की, विद्यार्थी मित्रांनो आपण ही आपल्या जीवनात सकारात्मक वृत्तीने जगले पाहिजे. सकारात्मक दृष्टिकोन आपण ठेवला पाहिजे. आणि आपल्या चेहऱ्यावर आपण सकारात्मक हास्य ठेवलं पाहिजे.

माझ्या महाविद्यालयात झालेल्या भाषणामध्ये माझे दुसरी मैत्रीण म्हणाली की, रात्रीचे आठ वाजले की, बाहेर निघावं असं वाटत नाही. स्वातंत्र वाटत नाही. हा नकारात्मक विचार मला थोडा खटकला, थोडा काय पूर्णच का खटकला असं म्हटलं तरी चालेल. मला माझ्या मैत्रिणीला असं सांगायचं आहे की, अगं अंधाराला दचकू नकोस काळ हा असाच राहील आकाशातील वीस गण सूर्यही मग तुझाच होईल... तुम्ही जितके घाबरला तितका समर्थ तुम्हाला जाणवेल कोणी आपले बारा वाजत असेल तर आपण त्याचे १३ वाजून घरी यायचं पण घाबरायचं नाही. नेहमी सकारात्मक मृत्यू ठेवायची बिनधास्त राहायचं एक स्त्री ही काय करू शकते हे आपण महाभारतात त्या द्रौपदीकडून शिकल पाहिजे.

पाच पांडव जेव्हा द्रौपदीला द्यूतमध्ये हारतात तेव्हा दुशासन तिला तिच्या खोलीमधून विश्राम करीत असताना तिचे केस धरून तिला अपमानित पणे सरकत भरलेल्या राज्यसभेत आणतो आणि त्या भरलेल्या राज्यसभेत द्रोपतीच्या व सहनाचा प्रयत्न केला जातो. तिला अपमानित केले जाते, अपमानितपणे बोलले जाते. तरीही त्या अपमानाला सहन करून नंतर ती शपथ येते की जोपर्यंत दुशासानाच्या रक्ताने माझे केस मी धुणार नाही तोपर्यंत मी केस मोकळ ठेवीन आणि संपूर्ण कौरवांचा नाश करायला ते भाग पाडते हे सांगण्याचा उद्देश असाच की लढा देण्याची वृत्ती संघर्ष करण्याची प्रवृत्ती आपल्यामध्ये पाहिजे कोणालाही न घाबरता... सबसे बडा रोग क्या कहेंगे लोक अशा प्रकारचे नकारात्मक भावना आपल्या मनात ना आणता आपण बिनधास्त जीवन जगले पाहिजे. सकारात्मक वृत्ती आपण ठेवली पाहिजे.

''उदास होने के लिए उमर पडी है
नजर उठाव सामने जिंदगी खडी है
अपनी हसी को, होटो से न जाने देना
क्यो की आपकी मुस्कुराहट के पीछे
दुनिया पडी है।''
Be Positive Be Happy

# साने गुरुजी

– सारिका शंकर बंगाळ

साने गुरुजींचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी झाला. असे असले तरीही साने गुरुजींची कर्मभूमी ही खान्देश आहे. त्यांच्या आईने त्यांच्या बालपणावर जे विविध संस्कार केले त्यातूनच गुरुजींचा जीवनविकास झाला. त्यांनी इंग्रजी साहित्यामध्ये एम. ए. ही उच्च पदवी मिळवली होती.

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्ष (१९२४ ते १९३०) नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतीगृहातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली. अमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला.

इ. स. १९२८ साली त्यांनी 'विद्यार्थी' हे मासिक सुरू केले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच व्यापार करत असत. इ.स. १९३० साली त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. त्यांनी 'काँग्रेस' नावाचे साप्ताहिक काढले. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न केले. जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशन (१९३६) मध्ये यशस्वी होण्यासाठी त्यांनी खूप काम केले. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधीच्या विचारसरणीस अनुसरून त्यांनी 'मैला वाहने' व ग्रामस्वच्छतेची इतर कामे केली. साने गुरुजी यांनी 'राष्ट्र सेवा' दलाची स्थापना केली.

समाजातील जातीभेद, अस्पृश्यता यासारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा यासाठी साने गुरुजींनी उपोषण केले व हरिजनांना न्याय मिळवून दिला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या मार्गाने त्यांनी भारत जोडण्याचा प्रयत्न केला. १९४८ मध्ये त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, लेख, निबंध, चरित्रे, कविता यामधून त्यांच्यातील संवेदनशील साहित्यकही आपल्याला दिसतो. 'श्यामची आई' ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असताना लिहिली गुरुजींनी आई वडिलांच्या प्रेमावर 'मोलकरीण' नावाची अप्रतिम कादंबरी लिहिली. गुरुजींनी लिहिलेली 'कादंबरी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' ही कविता, 'बल सागर भारत होवो' हे देशभक्तीपर गीत तसेच 'श्यामची आई' व 'शाम' ही पुस्तके विशेष प्रसिद्ध आहेत. सानेगुरुजींना स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीमध्ये काम केल्याबद्दल तुरुंगवास भोगावा लागला होता. सानेगुरुजींची स्वातंत्र्यलढा व साहित्यिकांमध्ये मोलाचे योगदान आहे.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

– लोकेंद्रनाथ नरेंद्र खांजोडकर

स्वातंत्र्य सैनानी लढले म्हणणी
स्वातंत्र्य आम्हा लाभले
मातृभूमी स्वतंत्र झाली तव पर्व नवे आरंभले
गुलामगिरी संपून गेली
दोर तुटले पारतंत्र्याचे
अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आले
विचार पेटले सृजनाचे
जूलूम संपला शेतसाऱ्याचा
दमदाटी थांबली
शोषणाची क्रूर परंपरा सर्वप्रयत्न गाडली
खूप कष्टाने मेहनतीने
वीरांनी स्वातंत्र्य हे मिळवीले
प्राणांची आहुती दिली
तवा दिवस हे उगवले
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
करू साजरा सारेजण
सदा सर्वदा स्वातंत्र्य सेनानींचे कृतज्ञतेने करु स्मरण

# हक और आजादी

– प्रियंका पद्माकर चौधरी

आजकाल शहरो को आग लगाना आसान हो गया है,
किसी मजहबी बातो का जिक्र कर के देख लो,
चंद पलो मे दंगे भडकाये जाते है...
और यही वजीरे हुक्म हो गया है....।
यहा के लोक कहते है
कभी कभी
हम सब एक है
और
खून सबका लाल हे,
मजहब आये बीच मे कभी तो
यही खून कभी हरा पिला तो
कभी नीला हो जाता है...!
यह अन कहे मंजर लिखू, कैसे कलम से अपने ?
यहा सियासते लिखने वाले को ही गुन्हेगार समज लेती है...!
फिर भी इस दौर में कोई जशन मनाये जायेंगे,
सच्ची आजादी के गीत लोग दिल से कहेंगे....!
हम आज लिखते है सच्चाई यहा कि,
ओर कल हमे लोग कभी राहत तो कभी कसाब कहेंगे...!
उम्मीद है की जल्द ही यह सुरत बदलेगी जरूर
और लिखने सच्चाई
कलम हमारे उठेगी जरूर...!
हम यहा कि सियासतो से पुछते है
चलो आओ और बताओ,
हमारे हिस्से की आजादी कहा है?
हमारे हिस्से की आजादी कहा है?

# हीच खरी सत्ता आमची

– धनश्री गजानन माळी

फुले, शाहू, आंबेडकर, छत्रपती, अण्णाभाऊचा
विचारांचा वारसा या जनमाणसात जन्माला यावा
मंदिर, मज्जिद, भोंगे, आंदोलन, हिंसा नको
उपाशी या जनसमुदायाला अन्नाचा घास हवा.
राजकीय पक्ष आपली पोळी भाजून घेतोय
तुमच्या आमच्या रक्ताची होळी आनंदाने साजरा करतोय
तुम्ही चितवत आहात तरुणाईला, अडाणी डोक्याला
स्वतःचं पोरगं मात्र परदेशी डॉक्टर, वकील साहेब होतय
इथली भूक थांबणार नाही मंदिर, मज्जिद, भोंगे करून
हातात झेंडे, आणि उरात जातीपातीचा द्वेष भरून
तुम्ही भाषणे करा आणि खिसे घ्या भरून अन
माणुसकीचा विरोध इथे माणसाकडून
खुशाल ढाल, तलवार घ्या हातात पुढच्या रांगेत उभे राहून
बहुजनांचं मूल नको तुमचीच घ्या परदेशातून बोलवून
आमची साथ नेहमी तुमच्या सोबत असेल
साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है हेच गणित आमचं असेल.
सत्ता तुमच्याकडून पिढ्यानपिढ्या उपभोगली जातेय
आमची बहुजन मुलं मात्र पक्षाचा झेंडा खादी मिरवतोय
वेगवेगळ्या पक्षात कार्यकर्ता तर कोणी अध्यक्ष होतोय
रक्ताच्याच माणसाचं रक्त रस्त्यावर सांडतोय
तुम्ही भाषण देऊन संध्याकाळी एकच ताटात जेवतात
कट्टर कार्यकर्ता भावकीच्या मायतीत सुद्धा अंतर ठेवतात
तुम्ही गार एसी आणि कुलरची हवा घेत असतात
अन कार्यकर्ता उन्हात चटई सतरंज्या उचलतात
आम्हा हव्यास नाही या उपभोगलेल्या सत्तेची
शिक्षण, नोकरी, आरोग्य, निवारा हीच सत्ता आमची !!

# आदरणीय वडील

– कीर्ती देविदास पवार

आई मांगल्य असते, तर बाप घराचं अस्तित्व असतो. पण या अस्तित्वाला खरंच आम्ही कधी समजून घेतलेलं आहे का? वडिलांना महत्त्व असून ही त्यांच्या विषयी जास्त लिहिलं जात नाही. कोणताही व्याख्याता आईविषयी बोलत राहतो. संत-महात्म्यांनी आईचच महत्त्व अधिक सांगितले आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते. पण बापाविषयी कुठेच फारसं बोललं जात नाही. लोकांनी बाप रेखाटला पण तोही तापट, व्यसनी, मारझोड करणाराच. समाजात एक - दोन टक्के असे बाप असतीलही पण चांगल्या वडिलांबद्दल काय?

आईकडे अश्रुंचे पाठ असतात. पण बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते. पण सांत्वन वडिलांनाच करावं लागतं आणि रडणाण्यापेक्षा सांत्वन करणाऱ्या वरच जास्त ताण पडतो.

कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना? पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळत राहत! रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते. पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही किती सहजपणे विसरून जातो.

सर्वांसमोर आई मोकळेपणाने रडू शकते, पण रात्री उशीर तोंड खूपसून मुसमुसतो तो बाप. आई रडते वडिलांना रडताही येत नाही. स्वतःचा बाप वारला तरी त्याला रडता येत नाही. कारण छोट्या भावंडांना जपायचं असतं. आई गेली तरी रडता येत नाही. कारण बहिणींचा आधार व्हायचा असतो. पत्नी अर्ध्यावर सोडून गेली तर पोरांसाठी अश्रूंना आवर घालायची असते. जिजाबाईंनी शिवाजी घडवला तसं अवश्य म्हणावं. पण त्यावेळी शहाजी राजांची ओढाताण सुद्धा ध्यानात घ्यावी. देवकी यशोदेचा कौतुक अवश्य करावे, पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेव सुद्धा लक्षात ठेवावा. राम हा कौसल्याचा पुत्र अवश्य असेल पण पुत्र योगाने मरण पावला तो 'पिता' दशरथच होता.

वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपलांकडे बघितले, ते फाटके बनियान बघितले की कळतं आमच्या नशिबाची भूक त्याच्या बनियानला पडले आहे. त्यांची दाढी वाढलेला चेहरा त्यांची काटकसर दाखवितो. मुलीला व मुलाला अंगभर कपडे घेतील पण स्वतः मात्र जुनी पॅन्ट वापरतील मुलगा सलूनमध्ये वीस-पंचवीस रुपये खर्च करतो, मुलगी पार्लरमध्ये करते. पण त्याच घरातला बाप दाढीचा साबण संपला म्हणून अंघोळीच्या साधनाने दाढी करतो. अनेकदा तो नुसती पाणी लावून दाढी करतो. बाप आजारी पडला तरी लगेच दवाखान्यात जात नाही कारण तो सर्वांचीच काळजी करणारा असतो. म्हणून घराचा आधार आणि कळस हे वडीलच असतात.





शारीरीक शिक्षणशास्त्र एम. पी. एड. वर्ग

शारीरीक शिक्षणशास्त्र एम. पी. एड. वर्गातील गुणवंत विद्यार्थी





शारीरीक शिक्षणशास्त्र प्रात्यक्षिक परिक्षा

शारीरीक शिक्षणशास्त्र प्रात्यक्षिक परिक्षा






व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा
वक्ते – डॉ. साहेबराव भुकन, खिरोदा

व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा





विद्यार्थ्यांना उद्बोधन करताना
डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर, जळगाव

वार्षिक क्रीडा स्पर्धा






वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम

वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम






वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम

वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम




वार्षिक स्नेहसंमेलन



विद्यार्थी गुणगौरव कु. सुवर्णा निकम
(कथक नृत्यप्रकार)



वार्षिक स्नेहसंमेलन




वार्षिक स्नेहसंमेलन – समुह नृत्य



वार्षिक स्नेहसंमेलन




वार्षिक स्नेहसंमेलन




वार्षिक स्नेहसंमेलन




वार्षिक स्नेहसंमेलन – लोककला सादरीकरण



जागतिक आरोग्य दिन कार्यक्रम



व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम



व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम



वार्षिक स्नेहसंमेलन

# 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव'

– प्राची किशोर भोई

कुठे कमी पडतोय...!

आपल्या देशात अतिशय मोठ्या उत्साहाने साजरा होणाऱ्या ७५ व्या स्वातंत्र दिनानिमित्त हर घर तिरंगा मोहिमेला मिळणारा प्रतिसाद, प्रत्येकाच्या घरावरील राष्ट्रध्वज, Social media वरील तिरंगी dp पाहून मन अतिशय भारावून गेले. पण मात्र देशाला बाहेरून पाहताना मनात विचार आला की जितकं देशाप्रती प्रेम आपण व्यक्त करतो तितके प्रेम आपण आपल्या देशावर करतो का? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायचा एक तर देशावर प्रेम करणं म्हणजे नेमकं काय? याचीच व्याख्या आपल्यात चुकीच्या पद्धतीने रुजवली गेलीय.

माझ्या मते देशावर प्रेम करणं म्हणजे आपल्या वर कुणाचीही नजर नसताना देखील आपल्याला दिलेले काम हे वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून प्रामाणिकपणे पार पाडणे इतकं सोपं आहे. आणि यात आपण प्रत्येक जण कुठे ना कुठे कमी पडतोय, त्यात काहींची मजबुरी असते तर काहींचा स्वार्थ.....!

१९४७ मध्ये स्वातंत्र मिळून निर्मित झालेला भारत देश हा त्याच्या विविधतेमुळे जास्ती काळ न टिकता त्याचे असंख्य तुकडे होतील असे म्हणणाऱ्या त्या काळीचे ब्रिटिश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांना आपण आजपर्यंत आपल्या एकजुटीने चुकीचे सिद्ध करत आलोय. मात्र आज स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण केलेल्या आपल्या देशाने खरंच प्रगती केली का हो? हो नक्कीच आपण प्रगती केली यात काही दुमत नाही!

ISRO, IIT, अनेक मोठ्या खढ कंपनी अनेक नामांकित कंपनीचे सीईओ ऑलिम्पिकमधील मेडल्स आणि खूप काही....! अर्थातच यात योगदान देणाऱ्या सर्व लोकांनी आतापर्यंत आपले सर्वस्व देशहितासाठी अर्पण करून मेहनतीने शून्यातून विश्व निर्माण केले. पण मात्र कुठेतरी असं नेहमी वाटतं की, resource आणि support च्या अभावी जगात No.1 असल्याची पात्रता असणारे आपण Developed देशांच्या तुलनेत प्रचंड मागे का आहोत. ज्या वेगाने आपण प्रगती करायला हवी तशी खरंच होते का? अमेरिका, युरोपियन देश, चीन, जपान यासारखे अनेक देश आपल्या मागून येऊन प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर झालीत. तसेच अशा अनेक गोष्टी आहेत ज्यात भारताने देखील जगापेक्षाही खूप प्रगती केली आहे. (विशेष म्हणजे रिनेबल एनर्जी आणि प्राणी संवर्धन) पण खरंच समाधान वाटण्यासारखं आहे का? आणि मूलभूत समस्यांचा काय? आजही गावी गेल्यावर रोज सकाळी दलित समाजातील एक स्त्री ताई भाकर वाढ म्हणून हाक मारते आणि आपलं पोट भरते (अशी उदाहरणे आपल्याला कुठल्याही स्टेशन अथवा रस्त्यावर मिळतील) त्या प्रत्येक क्षणी जगाशी स्वतःची तुलना करणारे आपण कितपत योग्य आहोत हा विचार येतोच. ह्या सर्वामागील पहिलं कारण म्हणजे आपल्या देशावर प्रेम न करणारे आपण! आणि दुसरं म्हणजे ही गोष्ट वाचन करणारे आपण जोपर्यंत आपण! विभाग मान्य करत नाही तोपर्यंत प्रगती नाही.

# ‘भारताच्या अखंडतेत शिक्षकांचे योगदान’

– सोनाली मधुकर साळुंखे

योगदान हे जगातील सर्वात पवित्र कार्य आहे. सर्वच यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये यशाची बीजे रुजविण्याचे काम शिक्षक करत असतात. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यात शिक्षकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. शिक्षकांचे कार्य हे समाजसेवेचे कार्य आहे.

आपला देश गुरु परंपरा मानणारा देश आहे. त्याच बरोबर गुरु शिष्याचे महान परंपरा असलेला ही देश आहे. संपूर्ण जगाला ज्ञान व संस्थेचे धडे देणारे गुरुकुल शिक्षण पद्धती ही भारतीय संस्कृतीचा महान ठेवा आहे. गुरुकुल शिक्षण पद्धती जगभरातून अनेक विद्यार्थी भारतीय गुरुकुलांमध्ये शिक्षण घेत. गुरुकुलांमध्ये शिक्षण घेतलेले विद्यार्थी पुढील देशाच्या राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मोलाची भूमिका पार पाडीत असत आणि आजही आधुनिक युगात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळात भारतीय शिक्षण परंपरेत शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व देश विकासाचे माध्यम मानले जाते आणि देशाच्या जडणघडणीच्या या प्रक्रियेत शिक्षकांचे मोलाचे योगदान असते.

आज आपण देशाच्या अखंडते बाबत फार मोठ-मोठ्या बातम्या, जाहीरनामे वाचतो. पण प्रत्यक्ष कृतीच्या वेळी आपण मागे राहतो मग कशी होणार भारताची प्रगती. अखंडतेसाठी प्रत्येकाचे योगदान हे महत्त्वाचे आहे. परंतु सर्वांमध्ये शिक्षकाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कारण भविष्याचे भावी नागरिक घडविण्याचे कार्य त्यांच्या हातून घडत आहे. उत्तम संस्काराची रुजवण ते करत असतात. मुलांकडून राष्ट्र उभारणीची तयारीच जणू ते करत असतात. शिक्षणाचा केंद्रबिंदू हा विद्यार्थी असून शिक्षक हा दिशा दाखविणारा, सुविधा पुरविणारा, सुविधा निर्माण करून देणारा सुविधादाता आहे. भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री नेहमी म्हणायचे की ‘शिक्षक हा राष्ट्राचा कणा आहे.’ भारताचे पूर्व राष्ट्रपती व विख्यात शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी भारताला महासत्ता बनवायचे असेल तर, ‘शिक्षकच त्याचे प्रेरक माध्यम ठरू शकतात.’ असे गौरवोद्गार शिक्षकांविषयी काढले होते. याचाच अर्थ वर्गांच्या चार भिंतींमध्ये शिकणारी ही पिढी भावी काळात देशाचे नेतृत्व करत आपले स्वकर्तृत्व सिद्ध करणार असल्याने देशाच्या जडणघडणीत शिक्षकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

‘‘नेहमी ज्ञानाची तहान असते तो शिक्षक
नेहमी विद्यार्थ्यांची प्रगती पाहतो तो शिक्षक
नेहमी ज्ञान अंजनाने प्रगल्भ करतो तो शिक्षक
नेहमीच घडतो आणि घडवितो तो शिक्षक’’

शिक्षक म्हणजे संस्कार, शिक्षक म्हणजे अनुभव शिक्षक या शब्दांमध्ये खूप मोठा अर्थ सामावलेला आहे. शिक्षक म्हणजे शिकवणारी व्यक्ती नव्हे तर शिक्षक म्हणजे अशी व्यक्ती जी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देते. प्रत्येक विद्यार्थ्याला संस्कारक्षम करणारी आणि येणाऱ्या भावीपिढीला योग्य दिशा दाखवणारी व्यक्ती होय. देशाची भावी पिढी शिक्षकांच्या योगदानातूनच घडत असते. केवळ कर्तव्य म्हणून नव्हे तर प्रत्येक शिक्षक आपली स्वतःची जबाबदारी म्हणून आपल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर झटत असतात.

‘‘शब्दांनी ज्ञान वाढवणारा,
जगण्यातून जीवन घडविणारा,
मूल्यातून तत्वे शिकविणारा,
समाजाला योग्य दिशा दाखविणारा,
तो म्हणजे शिक्षक!’’

एक शिक्षक जर चुकला तर संपूर्ण पिढीचे नुकसान होते. शिक्षक अराजकतेला कधीच पाठिंबा देत नाहीते. देशाच्या एकतेचा, अखंडतेचा विचारच कायम त्याच्या ठायी असतो. चुकीच्या विचारांना ते कधीच खतपाणी घालत नाही. कोणी देश विघातक कृत्य करत असेल तर त्याला वेळीच आळा घालायचे काम शिक्षकच चांगल्या पद्धतीने करू शकतात.

‘‘प्रत्येक वाईट गोष्टीला रागावतात
चांगल्या गोष्टींच्या मार्गावर चालायला लावतात
जिथे विद्यार्थी चुकतो तिथे अडवतात
म्हणूनच तर शिक्षक देश घडवतात.’’

आपला भारत देश शांतता प्रिय आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे त्याचबरोबर आधुनिक विचारसरणीमुळे लोकांच्या वागण्या बोलण्यात देखील एक बदल होत चालला आहे. शिक्षकच अशी एक व्यक्ती आहे जी विचारसरणी, मनोवृत्तीत बदल घडवून आणू शकते. जर देशाला उच्च शिखरावर न्यायचे असेल तर तो एक संघ असणे फार गरजेचे आहे. तुकड्यात विभागलेल्या देशात शांतता कधीच नांदू शकत नाही. देश हा बलाढ्य आणि बलशाली बनवण्यासाठी सर्वांचेच योगदान महत्त्वाचे ठरणार आहे.

राष्ट्राच्या, मुलांच्या, जडणघडणीत शिक्षकाचा फार मोठा वाटा आहे. मुलांना घडवतांना त्यांची ज्ञान लालसा पूर्ण करतात. बौद्धिक, शारीरिक, मानसिक व सामाजिक विकासात मदत करतात. मुलांना फक्त पुस्तकी ज्ञान देत नाहीत तर समाजात कसे राहायचे, कसं वागायचे, काय करायचे, काय करू नये याचा जीवन पाठ देतात. मुलांमधल्या सुप्त गुणांना वाव मिळवून देतात राष्ट्रभक्ती, राष्ट्र अभिमान वाढवतात. चांगल्या गुणांना खतपाणी घालतात. भावी जीवनाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन देतात. सामाजिक मानसिकता बदलविण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर असते. नैतिकता आणि मूल्य हे शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे महत्त्वपूर्ण काम शिक्षक करतात. शिक्षणाच्या माध्यमातून च व्यक्तीला चांगल्या आणि वाईट यामधील भेद समजतो. विद्यार्थ्यांना संवेदनशीलता आणि प्रतिष्ठा यांच्या आघाडीवर घेऊन जाण्याचे काम शिक्षकांनाच करावे लागते शिक्षकांना जागा निर्माण करावी लागते आणि अध्ययन वातावरण तयार करावे लागते शिक्षकांना दीपस्तंभाची भूमिका पार पाडावी लागत असते.

देशाचे भवितव्य भावी पिढीवर अवलंबून आहे. सर्व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व चांगले घडावे यासाठी शिक्षक अहोरात्र प्रयत्न करत असतात. बलवान राष्ट्र घडविण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका शिक्षक बजावतो. शिक्षक म्हणजे समाज घडविणारा सर्जनशील घटक राष्ट्राची ध्येय धोरणे बळकट करण्यासाठी व देशाला अधिक बलशाली बनवण्यासाठी जे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे आखली जातात त्यांची रुजवण करणारा, ती मुले वृद्धिंगत होण्यासाठी संस्कार करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक राष्ट्र उभारणीत शिक्षण व शिक्षक यांना म्हणूनच फार महत्त्व आहे. देशात शांतता, सुव्यवस्था हवी असेल तर सर्वांनी शिक्षण प्रवास यांनी फार गरजेचे आहे. शिक्षण हे असेच एक प्रभावी शस्त्र आहे आणि शिक्षक या शास्त्राचा प्रभावीपणे वापर करून आपले इच्छित ध्येय साध्य करू शकता.

धर्म, प्रांत, जात, देश या मर्यादा ओलांडून गेल्याशिवाय देशात अखंडता अबाधित राहू शकत नाही. सर्व जाती धर्माचे लोक जेव्हा गुण्या गोविंदाने एकत्र राहते तेव्हा आपोआप देशातील शांतता नांदेल. देश खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम होण्यास मदत होईल.

''गुरुचा असावा ध्यास<br>
प्रश्नांची व्हावी रास<br>
मग यश मिळेल हमखास।''

'शिक्षक' हा कामगार नाही. तर 'शिल्पकार' आहे. भारत देश संतांची भूमी असलेला देश संतांनी दिलेले शिकवण पुढे नेण्याचे चोख काम शिक्षक करत आहेत. शिक्षक समाजाला दिशा दाखविण्याचे काम करत असतो. लोकशाहीचा स्वीकार आपण केलेला आहे. शिक्षक हा लोकशाही मार्गाचा अवलंब करण्यासाठी उद्युक्त करत असतो. खऱ्या अर्थाने भारताच्या अखंडतेत शिक्षणाचे योगदान फार मोठ्या प्रमाणात आहे. त्यावर देशाचा विकास अवलंबून आहे. शिक्षक हा राष्ट्राचा आधारस्तंभ आहे आणि राहील...

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**– तेजश्री ताराचंद आहिरे**

''स्वातंत्र्य सेनानी लढले म्हणुनी
स्वातंत्र्य आम्हाला लाभले
मातृभूमी स्वतंत्र झाली
तवा पर्व नवे आरंभले

गुलामगिरी संपूर्ण गेली
दोर तुटले पारतंत्र्याचे
अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आले
विचार पेटले सृजनाचे

जुलूम संपला शेतसाऱ्याचा
दमदाटी ही थांबली
शोषणाची क्रूर परंपरा
सर्व प्रयत्ने गाडली
खूप कष्टाने मेहनतीने
वीरांनी स्वातंत्र्य हे मिळविले
प्राणाची आहुती दिली
तेव्हा दिवस हे उगविले

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
करू साजरा सारेजण
सदासर्वदा स्वातंत्र्य सेनानींचे
कृतज्ञतेने स्मरण''

१९४७ आपल्याला स्वातंत्र्य मिळाले ते इतके सहजासहजी नाही त्यासाठी स्वातंत्र्यासाठी अनेक वर्षापासून लोक लढत आले त्याचा आपण आदर केला पाहिजे आपले दुर्दैव असं की आज आपल्या देशात काही लोक मला कशाचे स्वातंत्र्य मला स्वातंत्र्य मिळालेच नाही. मी स्वातंत्र्य झालोच नाही. अशा व्यक्तींवर मला खूप राग येतो. स्त्रिया म्हणतात की मला स्वातंत्र्य मिळालं नाही. मी त्या स्त्रियांना सांगते की स्वातंत्र्याने आपल्याला काय दिले.

मी एक स्त्री आहे. स्वातंत्र्याने मला माणूस बनवले, मला शिक्षण दिले, मला पंख फुटले स्वातंत्र्यामुळेच मी चंद्रावर गेले स्वातंत्र्यानेच मी हा मी संशोधन केले. स्वातंत्र्यामुळे मी परिवार सेविका म्हणून राबणारी बाई आज कुटुंबप्रमुख झाले. स्वातंत्र्यामुळे मी सरपंच म्हणजेच गावप्रमुख झाले एवढेच नव्हे तर ह्याच स्वातंत्र्यामुळे मी देश प्रमुख झालो. स्वातंत्र्य अगोदर मी फक्त गाई म्हशी प्रमुख हीच माझी ओळख होती.

२०२२ ह्या वर्षी आपल्याला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली. म्हणून २०२२ ह्या वर्षी आपण देशवाशी संपूर्ण देशभर 'स्वातंत्र्याने अमृत महोत्सव' साजरा करीत आहोत. या निमित्ताने संपूर्ण देशभर विविध उपक्रम राबवले जात आहेत. विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये देशभक्तीपर उपक्रम राबविले जातात. आपल्याला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली आपण सुख सोयीने युक्त असे जिवन जगत आहोत. आपले शत्रू प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या आपल्यापर्यंत पोहोचत नाही म्हणून आज आपण सुखी असून स्वातंत्र्य उपभोगत आहोत याचा सर्वस्व हे देशाच्या शिपायांना देऊ देशाचा शिपाई देशाच्या सीमेवर तैनात असल्यामुळेच आपल्यापर्यंत संकट येत नाही सैनिकांना माझा कोटी कोटी प्रणाम.

''देऊनिया आहुती प्राणांची
वाचविले भारतभूमीला
संकटे सारी स्वतःवर झेलूनी
स्वतःच्या तनाच्या चिंधड्या होऊनी
जीवन त्यागले कार्य भूमीला.''

# ...जयघोष कर...

– सरिता प्रकाश इंगळे

सदा तयार असतात, जोर दावया वीर
या भूमीच्या पुत्रांना नका समजू कमजोर
जयघोष कर, मातेचा जयघोष कर! ।।धृ।।

पूर्वी पासून जिंकत आहोत, मोठे – मोठे किल्ले
करणार किती वेळा, तुम्ही पाठीमागून हल्ले.
प्रत्येक वेळी ऐट गाजवली आम्ही शत्रूवर
जयघोष कर, मातेचा जयघोष कर...! ।।१।।

आक्रमण, हल्ले, युद्ध हे, तुम्ही विसरा
आठवण नका देऊ, तो सव्वीस अकरा
नका भाग पाडू आम्हा युद्ध करणाऱ्या वारंवार
जयघोष कर, मातेचा जयघोष कर... ।।२।।

शिरच्छेद करून तुम्ही, दिले आव्हान आम्हा.
झाल्या आठवणी ताज्या, ताज असो वा सीमा
शपथ आम्हांला, उठू गर्जून करू पटल वार
जयघोष कर मातेचा जयघोष कर... ।।३।।

# जागतिक महिला दिन

– चेतना काळे

८ मार्च जागतिक महिला दिन अर्थात महिला सशक्तीकरण दिवस महिलांची शक्ती, त्यांच्या शौर्य, बुद्धी यांची प्रचिती तर सुरुवातीपासून सर्वांनाच होती. अगदी अनादिकाळापासून स्त्री शक्तीला वंदन करण्यात आले आहे. राक्षसांचा संहार असो वा आणखी कोणते कठीण काम स्त्री ही अग्रस्थानी सर्वदाच आहे.

बदलत्या परिस्थितीतही स्त्रीची भूमिका बदलली आहे. ती मुलगी, सून, पत्नी, माता या भूमिका व्यतिरिक्त अधिकारी, वैज्ञानिक, शिक्षक, कर्मचारी, मालक अशा अनेक रूपात दिसत आहे. तिच्या जीवनाला अनेक पैलू लाभले आहेत. आणि त्यांना आधिक चमक तिने आपल्या कर्तृत्वाने दिली आहे.

आपल्या बुद्धीचा, आत्मस्मानाला नवीन दिशा दिली आहे. आजच्या जगात असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे स्त्री नाही. प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या पुढे स्त्री आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला तर असे वाटते की महिलांना त्यांच्या हक्काची जागा मिळाली आहे.

एकंदरीत महिलांची आधुनिकतेकडे वाटचाल होताना दिसत आहे. आजची स्त्री अबल्या राहिलेली नसून ती सबला झालेली आहे. महिला या शब्दांबरोबर प्रेम, भावना, वात्सल्य, प्रेम, ममता या भावना समोर येतात. पण त्याच बरोबर शक्तीसंपन्न स्त्री ही समोर उभी राहतांना दिसते आहे.

अशा या महान कर्तुत्वान स्त्रियांना माझे त्रिवार नमन शेवटी थोडक्यात सांगते की

‘‘हजारो फुल चाहिये एक माला बनाने के लिए,  
हजारो दीपक चाहिये एक आरती सजाने के लिए ।  
हजारो बूंद चाहिये समुद्र बनाने के लिए ।  
पर एक ‘स्त्री’ अकेली ही काफी है ।  
घर को स्वर्ग बनाने के लिए ।।’’

# विषय मराठी भाषा संवर्धन काळाची गरज

**– चेतना मधुकर वानखेडे**

**मराठी भाषा संवर्धन**

२७ तारखेला कवी कुसुमाग्रजांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून उत्साहात साजरा केला जातोय...

एखादा दिवस साजरा करणे खूप सोप होत चालंय... पण आपण खरोखर आपली मराठी भाषा टिकावी म्हणून काही प्रयत्न करतोय का? किंवा करायला हवेत तर कोणते?

हजारो वर्षांपूर्वी लिहिला गेलेला श्रवणबेळगोळ येथे गोमटेश्वराच्या पुतळ्याखाली मराठी भाषेतील पहिला शिलालेख आढळतात. तर मराठीतील आद्यग्रंथ म्हणून 'ज्ञानेश्वरीचा' उल्लेख करतात मराठीचे महत्त्व ओळखून ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेतील भगवद्‌गीता प्राकृत भाषेत अनुवादित केली. मातृभाषेबद्दल असणारा आदरभाव व्यक्त करतांना ज्ञानेश्वर म्हणतात. माझा मराठीची ''बोलू कौतुके परी अमृतातेही पैजेसी जिंके।।''

मराठी ही इंडो-युरोपीय भाषा कुळातील एक भाषा आहे. भारतातील प्रमुख २२ भाषांपैकी मराठी एक आहे. महाराष्ट्र आणि गोवा ह्या राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही जगातील पंधरावी व भारतातील चौथी भाषा आहे. मराठी बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या ९,००,००,००० आहे. मराठी भाषा ९ व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृत मधून निर्माण झालेल्या महाराष्ट्र प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. महाराष्ट्रात पंथ, जाती, धर्म, संप्रदाय यांची विविधता यामुळे मराठीची प्रादेशिक रूपे साहजिकच अनेक आहेत.

अभिजन, बहुजन, भटके, विमुक्त, आदिवासी, दलित अशा विविध समाजांच्या विविध भाषिक रूपांनी महाराष्ट्र ध्वनीत होत असतो. मूळ भाषिक व इतर परंपरा आणि तिच्यात वेळोवेळी होत असतील किंवा होत असलेले बदल व त्यातून संक्रमित झालेली आजच्या पिढीची बोली किंवा तिची रूपे येथे आढळतात. 'पिकते तिथे विकत नाही' असे म्हणतात. तसेच महाराष्ट्रात राहून 'मराठी' भाषेचे महत्त्व तितके जाणवत नाही. आई समोर असताना आईचे महत्त्व जाणवते का? आपण जेव्हा परप्रांतात कधी काळासाठी जातो. व सतत जेव्हा ती पर प्रांतातील अनोळखी भाषा कानावर पडते. तेव्हा आपण आपली मातृभाषा ऐकण्यासाठी कासावीस होतो. चुकून आपली भाषा बोलणारी अनोळखी मंडळी दिसली तर ती माणसे अनोळखी असूनही खूप आपली वाटतात! हे भाषेचे अदृश्य धागे..!

भारतात 'कॉमन मिनिमम प्रोग्राम' अर्थात किमान समान कार्यक्रम ही संकल्पना सर्व परिचित आहे. सरकार कोणतीही योजना आखत असते वेळी एक दिशादर्शक म्हणून या संकल्पनेचा उपयोग होतो. आर्थिकदृष्ट्या मागास, शोषित वंचित अशा घटकांना त्याच्या हक्काचे स्थान मिळावे अशी या कार्यक्रमातील भूमिका असते. पण आपले सहसंमेलन शून्य होत जाणारे मन सध्या विसरत चालले आहे की, आपली भाषा आपली मातृभाषा ही सुद्धा जागतिक भाषेच्या रेट्यासमोर प्रसार माध्यमांच्या प्रभावाद्वारे तिच्या हक्कापासून वंचित होत आहे. आपल्याच मातृभाषेपासून आपण दुरावत आहोत. भाषेच्या शुद्धतेला आपण पारखे होत आहोत. एकीकडे इंग्रजी सारख्या भाषेचा द्वेष तर करायचा नाहीच; किंबहुना त्याचे ज्ञानही मिळवायचे हे आवाहन आहेच... त्याच बरोबरीने आपली भाषा समृद्ध करायची, तिचा वापर प्रसार करायचा तिचे अस्तित्व अबाधित राखायचे हे सुद्धा मोठा आव्हान आहे. स्वतःची मूळ भाषा टिकवून किंवा वेळप्रसंगी टाकून परभाषेचा स्वीकार करण्याची प्रवृत्ती आज वाढत आहे. प्रत्येक भाषांकडे असणारी लवचिकता बोलणाऱ्या उपयोगी पडते. या घटना वरकरणी सहज घडत असल्या तरी याचा परिणाम म्हणून काही भाषा दुर्बल बनत जातात. भाषेतील शब्दसंख्या कमी होत जाते आणि त्या भाषेचा परिणाम क्षीण होऊ लागतो. कालपरत्वे अशा भाषा विस्मरणाच्या सीमारेषेवर पोहोचतात. या सर्वेक्षणाच्या निमित्ताने हे निरीक्षण अधिक स्पष्ट झाले. अनेक समाज घटकांनी घरात बोलायची एक भाषा आणि घराबाहेर पडल्यावर बाहेर बोलायची एक भाषा हे दोन स्वतंत्र कप्पे केले आहेत.

मुख्य प्रवाहात येण्याची उर्मी, समाजातला वावर आणि आपली मूळ भाषात बोलल्यामुळे फारसे होणारे नुकसान यामुळे आपले मूळ परंपरागत भाषांकडे दुर्लक्ष होत गेले.

आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. तरीही इंग्रजी भाषेने आपल्या देशात भक्कम पाय रोवले आहेत. आज अनेक पालक मुलांना इंग्रजी शाळेत घालतात. उच्च शिक्षण मराठी भाषेतून उपलब्ध नाही. खरं तर, मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे. कारण लहानपणापासून शिकल्यामुळे आपल्या विचार व्यक्त करणे सोपे जाते. मातृभाषा हे ज्ञानभाषा झाली तर शिक्षण सुलभ होईल. याचा अर्थ असा नाही की, परकीय भाषा शिकू नये, परकीय भाषा जरूर शिकाव्यात, या भाषांचा आदर करावा, जर आपण आपल्या भाषेच्या समोर उभ्या टाकलेल्या आव्हानांना अन्य भाषांचा जरही द्वेष मनात येऊ न देता प्रति आव्हाने निर्माण नाही का करू शकणार ? आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग मानले जाते. संपर्क क्रांतीचे युग मानले जाते. अशा वेळी आपण आपल्या दैनंदिन जीवनात अशाच छोट्या - छोट्या कृतीनी काहीच नाही का करू शकणार? भाषेच्या जॉज्वल्य नाही तरी किमान मनस्वी अभिमानातून आपण किमान एखादी तरी कृती नाही का फुलवू शकणार?

भाषेसाठी सर्वस्याचा त्याग करणाऱ्या सक्रिय कार्यकर्त्यांना आपल्या परीने नाही का सहकार्य करू शकणार? मला वाटतं की हे फारसा अशक्य नाही. उलट या कृतीनी आपल्यालाच 'अल्प योगदान' दिल्याचे समाधान लागू शकेल. हा 'किमान भाषा वापर' असा कार्यक्रम नसून उलट किमान समान कार्यक्रमाच्या धर्तीवर आधारित 'भाषा संवर्धन आणि प्रसार कार्यक्रम' आहे.

१) आपण आपल्या दैनंदिन आयुष्यात रोज किमान १० तरी 'फोन कॉल' हाताळतोच. दहाही वेळा आपण संभाषणाची सुरुवात 'हॅलो...?' अशी करतो. आपण आपल्या भाषेबद्दलचे किंवा मातृभाषेतून संभाषणाची सुरुवात केली तर? म्हणजेच 'नमस्कार!' या शब्दाने आपण संवादास सुरुवात केली तर? त्यामुळे आपल्या भाषेबद्दलचे प्रेमही व्यक्त होईल शिवाय एखादी अनोळखी, व्यक्ती, जी आपल्याशी ते हिंदी अथवा इंग्रजीतून संवाद साधण्यात सुरुवात करते. मात्र तिचीही मातृभाषा मराठीतच असते अशी अधिक जवळीकिने मोकळेपणाने आणि मुख्य म्हणजे नेमक्या अभिव्यक्ती द्वारे आपल्याशी संवाद साधू शकेल.

२) आपल्या मोबाईल वरून आपण किमान दहा-पंधरा तरी लघुसंदेश (एसएमएस) दररोज पाठवतो. ते सगळेच अर्थातच इंग्रजीतून असतात किंवा इंग्रजी लिपी आणि मराठी शब्द अशा पद्धतीने असतात. आपण दिवसभरात किमान दोन लघुसंदेश मराठीतून पाठवले तर? पुन्हा एखादा भाषेवरील प्रेमाबरोबरच माहिती तंत्रज्ञानात मातृभाषेचा केला जाणारा वापर आपल्याबरोबरच समोरच्यालाही समाधान देऊ शकेल. शिवाय आज कित्येकदा घरकाम करणाऱ्या व्यक्ती इंग्रजी भाषेच्या अज्ञानामुळे मोबाईलचा परिपूर्ण वापर करत नाहीत. अशांना मराठीतील लघु संदेश पाठविले गेल्यास त्यांना आपण मूळ प्रवाहात आणल्यासारखे वाटेल.

३) जी बाब एसएमएसची तीच ई-मेलची सुद्धा! आपल्याला सध्या सर्वच संकेतस्थळाद्वारे 'फोनेटिक' (उच्चारावरून शब्द) पद्धतीने अनेक भाषेत ई-मेल पाठविण्यासाठी सुविधा आहे. ठरवून आपण दिवसभरात किमान एक ई-मेल मराठीतून नक्कीच करू शकतो.

४) आज आपल्याला सणांच्या सुट्ट्या हव्याहव्याशा वाटतात. पण भारतीय महिने आणि दिनदर्शिका आपण विसरतो. इतके की कित्येकदा 'गुरुपौर्णिमेच्या' तिथीऐवजी आपल्याला 'वटपौर्णिमेची' तिथी आठवते. पण चैत्र, वैशाख, ज्येष्ठ.... असे महिने आणि त्याच महिन्यात येणारे सण आपल्याला सांगता येतील का? नवरात्र म्हणजे अश्लील महिना हे किती जणांना माहिती असते? तेव्हा किमान ज्या सणांच्या आपल्याला राष्ट्रीय सुट्ट्या असतात. अशा सणांच्या तरी भारतीय दिनदर्शिकाची आपल्याला माहिती हवी आणि ते त्याच तिथीनुसार बोलता यायला हवी.

५) आपली हल्ली सामान्यपणे महिन्याला किमान एक तरी चित्रपट पाहतोच... मग तो कितीही 'टुक्कार' का असेना ! अशा-वेळी आपण आपल्या भाषेसाठी सुद्धा चित्रपट प्रेमातून काही करू शकत असेल तर? वर्षातून किमान दोन मराठी चित्रपट आणि दोन नाटके आपण नाही का पाहू शकणार? किंवा अगदी मित्र-मैत्रिणींसह जावून

आपण नाही का मातृभाषेतील कलाकृतींचा आस्वाद घेऊ शकणार?

६) आपण हल्ली सर्रास पुस्तके वाचतो. अशावेळी ठरवून वर्षाकाठी किमान दोन मराठी पुस्तके विकत घेऊन वाचणे ही कृती सुद्धा अशीच सहज जमणारी आणि भाषेसाठी काही केल्याचा आनंद देणारे ठरू शकेल. यापुढे जाऊन वाचकांचा एखादा गट तयार केल्यास मराठी पुस्तक खरेदीवर काही विशेष सवलत मिळू शकेल का ते पाहता येऊ शकेल.

७) वाढदिवसाला, शुभकार्याला अभिनंदन करतांना भेटवस्तू देण्याची प्रथा चांगलीच रूजली आहे. अशावेळी ही भेटवस्तू म्हणून सर्वोत्तम मराठी पुस्तके/काव्यसंग्रह/ नाट्यकृती यांचा आपण विचार करायला हवा. एक म्हणजे त्यासाठी आपण स्वतः ती कलाकृती वाचलेली असेल म्हणजे आपोआप वाचक म्हणून आपले भाषेसाठी योगदान होईल. आणि शिवाय इतरांना ती वाचायला दिल्याने भाषा प्रसारास भाषेतील पुस्तके विक्रीच्यांना देता येईल.

८) आता मात्र थोडी अवघड कृती सुचविते आहे. आपण राष्ट्रीयकृत बँकांमध्ये हे पाहिले असेल की तिथे दररोज एक नवीन बँकेच्या परिभाषिक सुचीतील हिंदी शब्द लिहिलेला असतो. अपेक्षा ही असते की आपण प्रादेशिक शब्दांच्या वापरास जालना मिळावी. तद्वतच आपणही मराठीतील दररोज किमान एक तरी नवीन शब्द त्याच्या सर्व छटांसहित नव्याने समजून घेतला पाहिजे. यामुळे कालबाह्य होणारा कित्येक शब्दांना (म्हणजे प्रत्येकी किमान ३६५ प्रतिवर्षी) प्रवाहात आणता येईल.

९) आपली स्वाक्षरी शक्य असल्यास मराठीतून करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा भाषा प्रसार कार्यक्रम प्रति महिना किमान लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे.

आजची आपली तरुण पिठी, त्यांची 'सेलिब्रेट' करण्याची वृत्ती त्यांची माहिती - तंत्रज्ञानावरील प्रेम, करमणूक प्रधान समाजारचना, दिन-विशेष असे बिंदू लक्षात घेता हा कार्यक्रम सहज शक्य आहे. असे मला वाटते. त्या जेवढी कृतीशील भर घालता येईल तेवढे उत्तमच!

# मराठी असे आमची मायबोली

– गायत्री शिंदे

असे कवी माधव जुलियन मोठ्या अभिमानाने सांगतात आणि तिला राज्यभाषा बनविण्याचे स्वप्न पाहतात. १९६५ साली त्या महान कवीचे स्वप्न साकार झाले. महाराष्ट्र राज्य निर्माण झाले, आणि मराठी या महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा झाली.

मातृभूमी आणि मातृभाषा याबद्दल रास्त अभिमान प्रत्येकालाच असतो. माणूस बहुभाषी झाला तरी सुख दुःखात त्याच्या मुखातून सहजपणे शब्द उडतात. ते त्याच्या मायबोलीतीलच परदेशात अन्य भाषिकांच्या गर्दीत वावरत असताना आपल्या मायबोलीतील शब्द कानावर पडले, तर सासुरवाशी माहेरचे माणूस भेटावे, तसा आनंद होतो व तो अवर्णनीय असतो.

आमच्या मायबोलीला मराठीच्या थोर प्राचीन परंपरा आहे. नव्या शतकात मराठीत लिहिलेल्या शिलालेख 'श्रवणबेळगोळ' आढळतो. तेराव्या शतकात 'ज्ञानेश्वरी' सारखा तत्त्वज्ञानात्मक काव्यग्रंथ मराठीत लिहिलेला आढळतो. या ग्रंथात ज्ञानदेवांनी मराठीची महती अनेक ओव्यातून वर्णिली आहे.

'माझ्या मराठीची बोलू कौतुके।<br>
अमृता तेही पैज जिंके।।'

असा त्यांना मराठीविषयी सार्थ अभिमान आहे. अनेक थोर कवींनी, संतांनी मराठीचा गौरव केला आहे. इतिहास काव्यातही मराठीला योग्य ते स्थान लाभले. शिवरायांनी मराठीचा शब्दकोश तयार करून घेतल्या. फारशी अरबी भाषांचे आक्रमण मराठीवर झाले, पण मराठी टिकून राहिली.

ज्या भाषेवर आपला पिंड पोसला गेला आहे, त्या आपल्या मायबोलीचे मराठीचे पांग आपण फेडले पाहिजेत. आपल्या या भाषेच्या समृद्धीसाठी झटले पाहिजे. आपल्या दैनंदिन व्यवहारात कटाक्षाने मराठीचा वापर केला पाहिजे, तरच आपल्या मुलीचे रूम आपण अंशतः फेडू शकू.

आपली मातृभाषा आपला मानबिंदू आहे. ती आपली ओळख आहे. आपण तिचा योग्य मान राखलाच पाहिजे. पण आज आपल्या मातृभाषेची अवस्था पाहिली की मन विषन्न होतं आपण आपल्या मातृभाषेला फारसे महत्त्व देत नाही. या महाराष्ट्रातच मराठी उपरी ठरते आहे, कारण मराठी माणसाच्या मनातलं मातृभाषेबद्दलचं कमी होत चाललेला प्रेम, ओढ नाहीसा होत चाललेला स्वाभिमान.

कुसुमाग्रजांनी म्हटले आहे मातृभाषेचे उपेक्षा करणे हे सांस्कृतिकदृष्ट्या किती दरिद्री होत चाललेले आहे. या भीषण वास्तवाची कल्पना आपल्याला निश्चितच येईल. आज मराठी माणूस उच्चशिक्षित होतोच, वेगवेगळ्या हुद्यावर काम करतोच, यशाची नवनवीन शिखर गाठतोच पण दुर्दैवाने आपल्या मातृभाषेपासून मात्र दिवसेंदिवस लांब जातोय.

उच्चशिक्षित मराठी माणसाला आज मराठीत बोलण्याची लाज वाटते. मातृभाषेत बोलणे त्याला कमीपणाचा वाटू लागलेय. जागतिकीकरणात सक्रिय होण्यासाठी इंग्रजी महत्त्वाचा आहे. हे नीसंशय खरं आहे पण त्याचं बरोबर आपली मुळे जपण्याची नैतिक जबाबदारी ही आपल्यावर असते हे विसरून चालणार नाही. आपली मातृभाषा आपणच जपली पाहिजे. मराठी भाषा सर्वकष करणे आजची अतिशय महत्त्वपूर्ण गरज आहे.

# डिजिटल भारत

– चारुशीला खैरनार

१ जुलै २०१५ पंतप्रधान नरेंद्र मोदी नरेंद्र मोदी द्वारा डिजिटल इंडिया प्रोजेक्ट सुरुवात की गयी थी। देश के लोगो के बेहतर विकास और वृद्धी के लिये एक प्रभावशाली योजना है। वरिष्ठ मंत्रालय सहयोगी और प्रमुख कंपनीयो के सी. ई. ओ. मौजूदगी मे बुधवार को पीएम के द्वारा डिजिटल भारत सप्ताह की सुरुवात (एक जुलै से सात जुलै तक हुई थी) सुशासन और अधिक नोकरी उपलब्ध के लिए भारत को एक डिजिटल विस्तार देना इसका लक्ष्य है।

विभिन्न उद्योगपतीयो की मौजूदगी मे दिल्ली के इंदिरा गांधी इंदोर स्टेडियम मै १ जुलै २०१५ को भारत की सरकार द्वारा डिजिटल इंडिया अभियान की सुरुवात की गई इसका लक्ष भारत को विश्व का एक बेहतर नियंत्रण बनाना है। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी द्वारा इस प्रोजेक्ट की एक लाख करोड रुपये अनुमोदित किया गया है २०१९ तक इसकी पुरा होने की उम्मीद है। इस कार्यक्रम की सफलता की गव्हर्नर के साथ भारतीय लोगो की सेवा करने के लिए नरेंद्र मोदी के सपने के सच होने जैसा होगा। कार्यवाही को बताने कार्य कुशलता मे सुधार और समय की बचत के लिये इलेक्ट्रॉनिक सरकार की सेवा के साथ भारतीय नागरिको को सहज करने के लिए है। ये योजना वास्तव में तेजगती की इंटरनेट सेवा के साथ दूर दराज के गाव और गाव ग्रामीण क्षेत्र को जोडणे के द्वारा खास थोर पर भारत के ग्रामीण इलागो मे वृद्धी और विकास को सुनिश्चित करेगा। वृद्धी और विकास को सुनिश्चित करेगा खुद प्रधान मंत्री इस प्रोजेक्ट की निगराणी कर रहे है। इंटरनेट के पोहोच मे आने के बाद 'डिजिटल इंडिया' के नागरिक अपने कौशल्य स्तर ज्ञान को सुधार सकते है।

डिजिटल इंडिया यह एक महत्त्वकांक्षी प्रोजेक्ट है। जो हर एक फायदा कर सकता है। सर से गाव वालो को बहुत ही अच्छा है कार्य करणे मे लंबी दूरी तय करते है। और समय तथा पैसा बरबाद करते है। पहले से प्रचलित राष्ट्रीय ही गव्हर्नर योजना का ये एक बहुत प्रभावशाली रूप (नी स्थंभ के साथ हायवे, लोकहित पोहोच कार्यक्रम हर जगह मोबाईल कनेक्टिव्हिटी, ई – क्रांती गव्हर्नर सभी को सूचना, नोकरी के लिए पूर्व फसल कार्यक्रम और इलेक्ट्रॉनिक निर्माण है।

भारतीय लोगो के लिये एक जन उपयोगी सेवा की तरह पुरे देश में डिजिटल संरचना हो क्योंकि ये तेज गति की इंटरनेट उपलब्ध करायेगा जिसमे सभी सरकारी सेवा तक आसान और तेज पोहोच हो जायेगी। ये नागरिको को जीवन पर्यंत अनोखा, ऑनलाइन सेवा, जैसे बँक खाता सर्वांना वित्त प्रबंधन सुरक्षित और सुनिश्चित सायबर स्पेस, शिक्षा, दुरस्त शिक्षा आधी के लिये बेहद कारगर साबित होगा। सुशासन की अत्याधिक मांग और ऑनलाईन सेवा डिजिटायझेशन के द्वारा वास्तविक समय मे सभी सेवा हो को उपलब्ध करायेगा। डिजिटल रूप बदली हुई सेवा भी वित्तीय लेन देन को आसान, इलेक्ट्रॉनिक बिना नगद के बनाने के लिए ऑनलाइन व्यापार करणे के लिये लोगो को बढावा देगी।

भारतीय लोगो को डिजिटल सशक्तिकरण डिजिटल संसाधनो वैश्विक पोहोच के द्वारा डिजिटल साक्षरता को वास्तव में मुमकिन बनायेगी। ऑनलाइन प्रमाणपत्र या जरुरी दस्तावेजो को जमा करने के लिए ये लोगो को समझ बनायेगी ना की स्कूल, कॉलेज, कार्यालय या किसी संस्थांनी भौतिक रूप से प्रस्तुती की जरुरत होगी।

इस तरह देश के समृद्ध विकास के लिये 'डिजिटल इंडिया' यह प्रोग्राम प्रधानमंत्री नरेंद्र जी मोदी ने शुरुवात कि है।

# The role of teacher in care of environment

- Dugar Pragya Tolaram

Teachers are best known for the role of educating the students that are placed in their care. Beyond that, teachers serve many other roles in the classroom Teachers set the tone of their classrooms built a warm environment mentor and nature students, become role models and listen and look for signs of trouble

A Teacher's job is to teach while students job is to learn the primary focus of any educational institution is to educate first Beyond that, schools sometime include environmentalism as a component in a student's education Teachers play important role to protect environment Teacher is guider, instructor of students The role of teacher is very important in nation making. They play a crucial role in forming changing and establishing attitudes and values among children for developing a better environment and making them realize their duties and role in preserving the earth. In the capital said, "Teachers have always played an immensely important role for the progress and development of society At a time when mankind is threatened by environmental disaster ender Gering the very existence of life on earth, the role of reaches has become all the more important.

Pointing towards the students successful campaigns ageist use of polythene bags and use of fire crackers, the former presidents proved that they could also make a difference is preserving environment Growth of such healthy at sustainable flue at the fore front of which remain school teachers and their pupils.

Prevention is better than cure is an old saying which is very apt in the context of environment and preparedness Global changes in term of green house warming A teacher is a friend, philosopher and guide of the students. Processionals in higher education can play and of the most decisive roles through innovative programmer by finding ways to integrate inters disciplinary and system approach in their higher level. Courses Through eco- club, Project work, etc. In this wahy the new generation can in bib and spread to families and community and prepare leading to reduced vulnerability and possible reeducation in impact of the disaster on lives, livelihood and property and an contribute in nation building.

The environment education should be a essential part of the curriculum it all the levels is primary to higher equating Teacher should take a leading role in Perusing the action on sustainable development and environment education whether action as undivided infusing environmental Perspectives into their classes or collectively fostering environmental education through their educational institutions we can give educational institutions we can give through more of outdoor activity. It is not only concerned with social sconce or science teachers. It is the moral duty for all for teacher who are involved in imparting education.

Teachers are expected to discharge the following functions.

- Developing awareness about environment.
- Provide specific and scientific knowledge topic.
- Organizing community surveys on issues relating to conservation and protection of environment .
- Organizing social service and community serviced programmers.
- Organize population days and Environmental days
- Select learning activities that will encourage responsible actions develop desirable values that help environment awareness among students. l.e the many ways teachers are play important role in protecting and caring environment.

# दि. ५ मार्च २०२१ या दिवशी मास्क वाटप इ गुलाब पुष्प वाटप अभियान राबविण्यात आले

**– प्रा. प्रविण कोल्हे**

केसीई सोसायटीच्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत खास जनजागृती अभियान शुक्रवारी राबविण्यात आले. कोरोनाचा कहर टाळायचा असेल तर मास्क घाला, असे सांगतानाच ज्यांनी मास्क घातले अशा जवळपास १०० नागरिकांना गुलाबाचे फुल देऊन प्रोत्साहित करण्यात आले, तर ज्यांनी मास्क परिधान केले नव्हते अशा ३०० नागरिकांना मास्कचे वाटप करण्यात आले. यातून एकाच दिवसात किमान ४०० जणांना सकारात्मक संदेश देण्याचे काम या अभियानाअंतर्गत करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य वाहतूक निरीक्षक श्री. देविदास कुनगर साहेब उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात उपस्थितांना रस्ते सुरक्षा, कोरोना संबधी घ्यावयाची काळजी तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक राणे यांनी अध्यक्षीय भाषणात कोरोना जनजागृती संदर्भात मनोगत व्यक्त केले.

कोरोना पुन्हा वाढत आहे त्यामुळे सध्या मास्क वापरणे हेच योग्य असल्याने त्याबाबत जनजागृती करण्यासह मास्क वापरणार्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. शुक्रवारी सकाळपासूनच मू. जे. महाविद्यालय मुख्य प्रवेश द्वारासमोर ही मोहीम विशेष पद्धतीने राबविण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रविण कोल्हे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वंदना चौधरी यांनी केले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी, केसीई सोसायटीचे जनसंपर्क अधिकारी प्रा. संदीप कुमार केदार, विभाग प्रमुख प्रा. निलेश जोशी, डॉ. शैलजा भंगाळे, श्री. संजय जुमनाखे, प्रा. केतकी सोनार, श्री. मोहन चौधरी, श्री. निलेश नाईक, श्री. शैलेश कुलकर्णी, विनोद पाटील हे उपस्थित होते.

अभियान यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्राचे विद्यार्थी यांचे अनमोल असे सहकार्य लाभले.

# केसीईच्या शिक्षणशास्त्र व शा. शि. महाविद्यालयात युवा स्वास्थ अभियानास प्रारंभ

**– प्रा. प्रविण कोल्हे**

केसीई सोसायटीच्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून युवा स्वास्थ अभियानास प्रारंभ करण्यात आला. महाविद्यालयातील प्रत्येक तरुणाचे कोविड प्रतिबंधक लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून जिल्ह्यात २५ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२१ दरम्यान युवा स्वास्थ अभियान हाती घेण्यात आले आहे.

सकाळी १० वाजता डॉ. संतोष चव्हाण (सहसंचालक जळगाव) यांच्या हस्ते लसीकरण केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. यात महाविद्यालयातील चार जणींनी दुसरा डोस घेतला. लसीकरण मोहीम जास्तीतजास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी महाविद्यालयाच्या वतीने सर्व प्राध्यापक वृंद प्रयत्न करीत आहेत. लसीकरण मोहीम यशस्वीतेसाठी डॉ. लिपिका प्रथ्यानी, स्टाफ नर्स कामिनी इसाळदे, सुनिता मुंडे, योगिता ठाकूर, अशा स्वयंसेविका संगीता ठाकूर यांचे सहकार्य लाभत आहे. महाविद्यालय परिसरातील 'मदर टेरेसा प्राथमिक आरोग्य केंद्रात' लसीकरण मोहीम राबविली जात आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे, उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी, विभाग प्रमुख प्रा. निलेश जोशी, प्रा. अतुल गोरडे, श्री. मोहन चौधरी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. वंदना चौधरी व प्रा. प्रविण कोल्हे यांनी केले.

# जागतिक एड्स दिन

**– प्रा. प्रविण कोल्हे**

के. सी. ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय जळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून दि.०१ डिसेंबर २०२१ हा दिवस जागतिक एड्स दिन निमित्त ऑनलाईन चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. नीलिमा सेठिया या उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात एड्सची सुरुवात कधी झाली तसेच एच.आय. व्ही. ची लागण कशी होते? या विषाणूची लागण झालेल्या व्यक्तीबरोबर राहिल्याने काही धोका उद्भवतो का? याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनीही आपले प्रश्न विचारून कार्यक्रमात सक्रीय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे हे होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात शिक्षकांनी एड्स जनजागृती अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आयोजन डॉ. वंदना चौधरी – महिला कार्यक्रम अधिकारी, प्रा. प्रविण कोल्हे– कार्यक्रम अधिकारी यांनी केले.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी, डॉ. शैलजा भंगाळे, डॉ. जयश्री पाटील, डॉ. रंजना सोनवणे, डॉ. सुनिता नेमाडे, डॉ. स्वाती चव्हाण, प्रा. अंजली बन्नापुरे, प्रा. पंकज पाटील, प्रा. किसन पावरा, डॉ. गणेश पाटील, प्रा. अतुल गोरडे हे उपस्थित होते.

# के. सी. ई. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शहीद दिना निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

– प्रा. प्रविण कोल्हे

जळगाव: केसीई सोसायटीचे शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. २३ मार्च २०२२ रोजी शहिद दिनाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यी- विद्यार्थीनिंनी मनोगत व्यक्त केले.

तसेच महाविद्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. माधवराव गोळवलकर स्वयंसेवी रक्तकेंद्र यांचे मदतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले शिबिरात २१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे यांचे मार्गदर्शनात करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. केतन चौधरी, रासेयो प्रमुख डॉ. वंदना चौधरी, प्रा. प्रवीण कोल्हे, केसीईचे जनसंपर्क अधिकारी प्रा. संदीप केदार, डॉ. शैलजा भंगाळे, डॉ. रंजना सोनवणे, डॉ. गणेश पाटील, केतन पाटील, विजय चव्हाण, शरद सोनार तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**रक्तदाते**

१. प्रविण दामोदर कोल्हे
२. मोहम्मद अकिब शेख फरीद सिकलगर
३. जितेंद्र सुनील पाटील
४. कन्हैयालाल छगन माळी
५. नवीन शांताराम पाटील
६. हिरामण बाबुराव पाटील
७. भरत त्र्यंबक पालवे
८. MISS. तेजल समाधान श्रवने
९. आशिष दिपक खोडके
१०. दांडगे आकाश बबनराव
११. दिपक एस. बाविस्कर
१२. मनीष दिलीप सनेर
१३. अमोल सुधाकर चित्ते
१४. कैलास भगवान हटकर
१५. अरविंद नरसिंग जाधव
१६. उज्ज्वल सुभाष भोई
१७. प्रफुल्ल एकनाथ पाटील
१८. गिरीश भगवान सैंदाणे
१९. आशिष संदीप पाटील
२०. वैभव अशोक भालेराव

# आजादी का अमृत महोत्सव जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल रॅली आयोजन

**– प्रा. प्रविण कोल्हे**

केसीई सोसायटीच्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आजादी का अमृत महोत्सव– जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल रॅलीचे आयोजन दिनांक ०३ जून २०२२ रोजी करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रविण कोल्हे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वंदना चौधरी यांनी केले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी, विभाग प्रमुख प्रा. निलेश जोशी, प्रा. गणेश पाटील, श्री. संजय जुमनाखे, श्री. मोहन चौधरी, श्री. निलेश नाईक, श्री. विजय चव्हाण हे उपस्थित होते.

# जागतिक दिव्यांग दिन

– डॉ. शैलजा भंगाळे

समता, बंधुता, न्याय या तत्त्वांचा अंगिकार सर्व क्षेत्रात व्हावा या जागतिक दिव्यांग ३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा केला जातो. महाविद्यालयात यावर्षी जागतिक दिव्यांग दिना निमित्त ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा प्रशिक्षण संस्था,  वर्धा येथील प्रा. डॉ. संगीता महाजन यांनी विद्यार्थ्यांना विभिन्नता असलेली बालके त्यांचे प्रकार व त्यांच्यासाठी शैक्षणिक सुविधा याबाबत सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ए. आर. राणे यांनी आपल्या मनोगतात आपल्या महाविद्यालयात दिव्यागांसाठी विविध सुविधांबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. शैलजा भंगाळे यांनी केले.

# हिंदी दिन

**– डॉ. शैलजा भंगाळे**

१४ सप्टेंबर २०२२ रोजी हिंदी दिनानिमित्त महाविद्यालयात आयोजित विद्यार्थ्यांची मनोमन भाषणे आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. आर. राणे होते. चेतना वानखेडे, वसावे सुनीता, प्रा. शैलजा भंगाळे यांनी हिंदी भाषेचे राष्ट्रीय महत्त्व, स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, हिंदी भाषेची संवैधानिक स्थिती यावर भाषण दिले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आपल्या अभ्यासपूर्ण शैलीत गायत्री शिंदेने केले. प्राचार्य डॉ. राणे यांनी दैनंदिन जीवनात हिंदीचे व्यापक स्थान स्पष्ट केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रंगना सोनवणे यांनी केले.

१० जानेवारी विश्व हिंदी दिवसानिमिल निबंध स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत गिरीश भगवान सैंदाणे याने प्रथम क्रमांक मिळवला.

# अहवाल विभाग

महाविद्यालयाचा इतर शाळा व महाविद्यालय याच्या सोबतचा परस्पर सामंजस्य करार –

महाविद्यालयाने शैक्षणिक व क्रीडा शेत्रातील विविध उपक्रमांसाठी शाळा व महाविद्यालय याच्या सोबत जून २०१६ पासून परस्पर सामंजस्य करार केला आहे. याचा लाभ महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी तसेच शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांना झाला आहे. या कराराची व्याप्ती पुढील प्रमाणे ...

१ विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्रातील ज्ञन व कौशल्य यांचा विकास
२ विद्यार्थी आणि शिक्षक यांचे प्रशिक्षण व प्रत्यक्ष उपक्रम सहभाग
३ संशोधन आणि विकास
४ कौशल्य विकास कार्यक्रम
५ अतिथी व्याख्यानांचे आयोजन
६ शिक्षकांसाठी उदबोधन व उजळणी कार्यक्रम
७ शिक्षक विद्यार्थी अदान प्रधान उपक्रम
८ संयुक्तरित्या कार्यक्रमांचे आयोजन
९ आंतरवासिता कार्यक्रमाचे आयोजन
१० शालेय सराव पाठांचे आयोजन

वरील उद्देश साध्य करण्यासाठी महाविद्यालयाने खालील संस्थाशी सामंजस्य करार केला आहे.

१ आण्णासाहेब डॉ.जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव
२ नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव
३ श्रीमती प.न. लुंकड कन्या शाळा, जळगाव
४ श्रीमती शकुन्तला माध्यमिक विद्यालय, जळगाव
५ ए. टी. झांबरे माध्यमिक विद्यालय, जळगाव
६ ओरीओन स्टेट बोर्ड इंग्लिश मेडीम स्कूल, जळगाव
७ श्रीमती शेवंताबाई टोके विद्यालय,जळगाव
८ शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव
९ एकलव्य क्रीडा संकुल, जळगाव
१० जळगाव जिल्हा क्रीडा संघ, जळगाव
११ इकरा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मेहरूण, जळगाव
१२ सद्गुरू शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव
१३ सानेगुरुजी विद्याप्रबोधीनी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, खिरोदा
१४ श्रीमती सीताबाई गणपत भंगाळे, विद्यालय, जळगाव
१५ कै. भिलाभाऊ गोटू सोनवणे माध्यमिक विद्यालय, जळगाव
१६ महाराणा प्रताप विद्यालय व कानिष्ठ महाविद्यालय, जळगाव

**प्रा. शैलजा भंगाळे**
समन्वयक

# IQAC- 2021-22

**– डॉ. शैलजा भंगाळे**

शैक्षणिक वर्ष वर्ष २०२१-२२ मधे महाविद्यालयात IQAC तर्फे विविध उपक्रम घेण्यात आले. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयातील प्राध्यापकांचे सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदासाठी CAS नुसार IQAC समिती समार सादरीकरण झाले. प्रा. डॉ. रंजना सोनवणे, प्रा. डॉ. कुंदा बाविस्कर यांनी प्राध्यापक पदासाठी सादरीकरण केले. तर प्रा. डॉ. जयश्री पाटील यांनी सहयोगी, प्राध्यापक पदासाठी सादरीकरण केले. दि. ०५ ऑक्टोंबर २०२२ रोजी डॉ. लता मोरे, प्राचार्य सु. हि. नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर यांचे NAAC for Teacher Education Institutes या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानातून NAAC होत असताना येणाऱ्या अडचणी तसेच NAAC च्या विविध निकषांवर चर्चा करण्यात आली. हे व्याख्यान महाविद्यालयाच्या NAAC साठी फायदेशीर ठरले.

दि. २३ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या विषयाच्या अनुषंगाने स्वातंत्र्यानंतर भारताने केलेली प्रगती या मुद्दयावर विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त भाषण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत गायत्री शिंदे, रेखा हरणे, दानिश शेख, धम्मजोती तामस्वरे, चारुशीला खैरनार, ज्योत्स्ना पाटिल, स्वाती सोनवणे, यांनी सहभाग घेतला.

नॅकच्या मार्गदर्शक तत्त्व व निकषानुसार महाविद्यालयाचा AQAR तयार करण्यात आला. या शिवाय प्रत्येक प्राध्यापकांनी विविध सेमिनारमध्ये सादर केलेले संशोधन पेपरवर प्रत्याभरण द्वारे चर्चा करण्यात आली.

# महिला लैंगिक छळ निवारण कक्ष

**– डॉ. शैलजा भंगाळे**

महिला अत्याचार निवारण दिन दिनांक २५ नोव्हेंबर २०२१ रोजी संपूर्ण जगभरात आयोजित करण्यात येतो. महाविद्यालयामधे या दिवशी प्रा. संदीप केदार यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या वर्षाची या दिवसाचे महत्त्व Orange the world या ओळीने व्यक्त केले गेले. प्रा. शैलजा भेगाळे यांनी महिला अत्याचार निवारण दिनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. प्रा. संदीप केदार यांनी जगभरात निवारणार्थ असलेल्या विविध कायदेशीर बाबींचे विवेचन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ए. आर. राजे यांनी महिलांच्या सक्षमीकरणाची गरज स्पष्ट केली.

८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिन रोजी प्रणिता झांबरे, मुख्याध्यापिका, ए. टी. झांबरे हायस्कूल यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

# संशोधन केंद्र २०२१-२२

**- डॉ. शैलजा भंगाळे**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयात संशोधन केंद्रामार्फत तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली. दि. २९ अक्टोबर २०२१ रोजी पुढील व्याख्याने संपन्न झाली.

| अ.क्र. | दिनांक | तज्ज्ञ व्यक्तीचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| १. | २९/१०/२०२१ | डॉ. साहेबराव भुकन, खिरोदा. | संशोधन प्रस्तावाचे लेखन |
| २. | | डॉ. संजय भारंबे, जळगाव. | शिक्षणशास्त्र महाविद्यालयासाठी NAAC प्रक्रिया |
| ३. | | डॉ. गजानन गुल्हाने | स्वयम पोर्टलसाठी व्हीडीओ तयार करणे. |
| ४. | १२/०२/२०२२ | डॉ. सुरेश पाटील, य.च.म.मु.वि.नाशिक | शिक्षणशास्त्रातील संशोधन |
| ५. | २६/०५/२०२२ | डॉ. लता मोरे, नवापूर. | संशोधन पेपर लेखन. |

सर्व प्राध्यापक व संशोधन विद्यार्थ्यांनी वरील व्याख्यानांचा लाभ घेतला.

संशोधन केंद्राअंतर्गत पीएच. डी. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे सहामाही प्रगती अहवालीचे सादरीकरण ८ मार्च व ६ एप्रिल रोजी झाले. दि. १२ एप्रिल २०२२ रोजी संशोधक विद्यार्थिनी सौ. अर्चना अशोक वाघ हिचे पीएच. डी. pre submission presentation ऑनलाईन घेण्यात आले.

दि. २९ एप्रिल २०२२ रोजी महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी संशोधन पेपर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात सर्व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. नंदा परमार हिचा पहिला सहामाही अहवाल सादर झाला.

दि. २० सप्टेंबर २०२२ रोजी संशोधक विद्यार्थिनी कु. पूनम जमधडे हिच पीएच. डी. pre submission presentation घेण्यात आले. तसेच माधुरी पगारे व मनोहर बाविस्कर या विद्यार्थ्यांचा दुसरा सहामाही प्रगती अहवाल सादर झाला.

# महिला लैंगिक शोषण तक्रार निवारण समिती

विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या सूचनेनुसार महिलांचे लैंगिक शोषण कायदा २०१३ नुसार महाविद्यालयात महिला लैंगिक शोषण तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. ती पुढील प्रमाणे.

समिती प्रमुख - प्रा. डॉ. शैलजा डी. भंगाळे
महिला सदस्य - प्रा. कुंदा व्ही. बाविस्कर
महिला सदस्य - प्रा. सुनिता ए. नेमाडे
पुरुष सदस्य - प्राचार्य डॉ. ए. आर. राणे
पुरुष सदस्य- श्री. मोहन बी. चौधरी

महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सर्वांचा ठाम विश्वास आहे. की महिलांचे लैंगिक शोषण हे स्त्रियांच्या समानतेच्या मूलभूत हक्कांची हिंसाच आहे. महिलांच्या शोषणाविरुद्ध तसेच पुरुष समानतेबाबत शिक्षक विद्यार्थी व अन्य कर्मचारी यांच्यात जनजागृतीसाठी करणे. तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरणाची खात्री देणे. व लैंगिक शोषणाच्या तक्रारीचे निवारण करणे या दृष्टीने सदर समिती कार्य करील. समितीचे कार्य चार स्तरांवर होते. १) तक्रारीचे निवारण २) जण जागृती उपक्रम ३) समुपदेशन ४) योग्य माहिती उपलब्ध करून देणे.

**- प्रा. डॉ. शैलजा डी. भंगाळे**
समिती प्रमुख

# शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ दि. १५ जुन २०२१ पासून नियमित सुरू झाले. परंतु कोविड - १९ करीता शासनाने आणि विद्यापीठाने दिलेल्या प्रतिबंधात्मक सुचनानुसार महाविद्यालयातील अध्ययन अध्यापनाचे कामकाज १५ जून २०२१ ते ३० सप्टेंबर २०२१ पर्यंत ऑनलाईन स्वरुपात सुरु होते. ०१ ऑक्टोबर २०२१ पासून शासन व विद्यापीठाच्या सुचनेनुसार महाविद्यालयाचे अध्ययन अध्यपनाचे कामकाज नियमीत ऑफलाईन सुरू झाले.

ऑनलाईन अध्ययन अध्यापनाच्या काळात म हाविद्यालयाने नॅक पुनर्मुल्यांकन प्रक्रीया सुधारीत आराखडा या विषयावर महाविद्यालयाच्या आय.क्यू.ए.सी.मार्फत ०७ ऑगस्ट २०२१ रोजी राष्ट्रीय स्तरावरील वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विविध प्राध्यापकांनी ऑनलाईन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये सहभाग घेवून विविध विषयांवर शोध निबंध सादर केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी पीअर रिव्हयू रेफर्ड जनरलमध्ये आपले शोधनिबंध प्रकाशित करण्यासाठी आयोजीत केलेल्या संशोधन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच त्यांना त्यासाठी अल्पसे प्रोत्साहन अनुदान देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयातील पाच प्राध्यपकांसाठी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी युजीसी केअर लिस्ट जनरलमध्ये आपले शोध निबंध प्रकाशित करण्यासाठी आयोजित केलेल्या संशोधन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच त्यांना त्यासाठी अल्पसे प्रोत्साहन अनुदान देऊन गौरविण्यात आले. यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. नंदकुमार बेंडाळे आणि व्यवस्थापन परिषदेचे अनमोल मार्गदर्शन व सहकार्य प्राप्त झाले.

महाविद्यालयातील प्रथम वर्ष प्रवेश ०५ मार्च अखेरपर्यंत केंद्रीय प्रवेश योजनेनुसार पूर्ण झालेत. त्यानुसार दि. २८-०२-२०२२ रोजी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रानुसार शैक्षणिक वर्षाचा आरंभ दिक्षारंभ कार्यक्रमाने करण्यात आला. यासाठी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी आणि प.न.लुंकड कन्या शाळेच्या पर्यवेक्षीका सौ. वंदना तायडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाने भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रम आणि शहिद दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत माधवराव गोळवलकर स्वयंसेवी रक्तपेढी यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीराचे दि. २३/०३/२०२२ रोजी आयोजन करण्यात येवून त्यात २० विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी रक्तदान शिबीरात सहभाग घेतला.

महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या एकूण १७ विद्यार्थ्यांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्डने आयोजित केलेल्या डिसेंबर २०२१ च्या केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत यश संपादन केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने आयोजित केलेल्या अण्णासाहेब आर. डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी, ता.साक्री जि.धुळे येथे विद्यापीठस्तरीय श्रमसंस्कार व व्यक्तीमत्त्व विकास कार्यशाळेत दि. ०३ ते ०५ मार्च २०२२ मध्ये पाच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने ०७ मार्च २०२० रोजी आयोजित केलेल्या एस.एस. व्ही.पी.एस.कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे येथे विद्यापीठस्तरीय वत्कृत्व व कौशल्य कार्यशाळेत दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

महाविद्यालयातील बी.एड आणि बी.पी.एड.मधील गरीब आठ विद्यार्थ्यांना मा. अण्णासाहेब डॉ. जी.डी.बेंडाळे शिष्यवृत्ती योजनेनुसार प्रत्येकी एक हजार रुपयेप्रमाणे एकूण आठ हजार रुपये प्रदान करण्यात आले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने युवती सभा अंतर्गत मिळालेल्या अनुदानातून महाविद्यालयात महिलांसाठ आठ दिवसांचे स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. यासाठी प्रा. राजेंद्र जंजाळ यांनी प्रशिक्षण दिले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने युवती सभा अंतर्गत मिळालेल्या अनुदानातून महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी व्यक्तीमत्त्व विकास या विषयावर दहा व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यासाठी विविध दहा विषयांवर अनुभव संपन्न व्यक्तींनी मार्गदर्शन केले. दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी भारतीय संविधान दिनानिमित्त राज्यघटनेतील

सरनाम्याचे सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित प्रकट वाचन केले. या विषयावर प्रा. संदिप केदार यांनी मार्गदर्शन केले. दि. २५-०१-२०२२ रोजी महाविद्यालयात मतदान दिनानिमित्त जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. कुंदा बावीस्कर यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर महाविद्यालयात निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाच्या आय.क्यू.ए.सी.मार्फत दि. १२ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रा. सुरेश पाटील व य.च.मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे नविन शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

जळगाव विभाग आंतर महाविद्यालयीन क्रीडा समिती महाविद्यालयाला निर्देशित केल्यानुसार विविध आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यात दि. २४ डिसेंबर २०२१ रोजी महिला व पुरुषांसाठी हॅण्डबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दि. २० डिसेंबर २०२१ रोजी महिला व पुरुषांसाठी बेसबॉल स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या वर्षात महाविद्यालयातील एकूण २९ विद्यार्थ्यांनी आंतर विद्यापीठ स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठ संघातर्फे सहभाग घेतला. तसेच फ्लोअरबॉल या स्पर्धेत रौप्यपदक संपादन केले. या वर्षात विद्यार्थ्यांना महाविद्यालय विकास समितीने दिलेल्या निर्दे शानुसार आंतर विद्यापीठ खेळाडूंना प्रत्येकी १००० रु. क्रीडा शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली. तसेच पदकप्राप्त विद्यार्थ्यांना रोख पारीतोषीके देण्यात आली.

विद्यापीठ नियमानुसार बी.एड.विद्यार्थ्यांसाठी २० जून ते २३ जून २०२२ या दरम्यान वार्षिक पाठ परीक्षेचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी एकूण ७ शाळांची निवड करण्यात आली. २०२१-२२ मध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांची द्वितीय वर्षाची विद्यापीठ परीक्षा ०१ जुलै ते २२ जुलै २०२२ दरम्यान आयोजित करण्यात येवून त्यासाठी एकूण ४ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या केंद्रावर परीक्षा दिली.

संस्थेच्या निर्देशानुसार महाविद्यालयात शहरातील सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी १०० विद्यार्थ्यांसाठी वाचन कक्ष व संदर्भ ग्रंथ कक्ष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या वाचन कक्षाची जबाबदारी श्री महेशकुमार सावदेकर यांनी पार पाडली.

या वर्षात महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने प्राचार्य बी.पी.मरजे, सांगली, प्रा. गजानन गुल्हाने, अमरावती, प्राचार्य चंद्रकांत बोरसे, नाशिक, प्राचार्य साहेबराव भूकन, खिरोदा, प्राचार्य शत्रुंजय कोटे, औरंगाबाद, प्राचार्य अश्विन बोंदार्डे, माजी प्राचार्य कैलास बोंदार्डे, माजी प्राचार्य ह.ना.जगताप, सोलापूर, प्रा. संजीवनी महाले, प्रा. सुरेश पाटील, मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन दि.२५, २६ व २७ एप्रिल २०२२ या दरम्यान आयोजीत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे कोषाध्यक्ष डी.टी. पाटील, प्रा. रेखा भोळे, डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर, प्राचार्य ज्योती गोस्वामी या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने आंतर महाविद्यालय युवक महोत्सव युवारंग २०२१ पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा येथे आयोजित केलेल्या युवक महोत्सवामध्ये महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून कला सादर केली.

**Student Council for Work 2021-22**

| Sr. No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1 | Prin. Dr. Ashok R. Rane | Principal |
| 2 | Prof. Ketan P. Chaudhari | Vice Principal |
| 3 | Prof. Nilesh D. Joshi | Head Physical Education |
| 4 | Dr. Shailaja D. Bhangale | Coordinator - IQAC |
| 5 | Prof. Pankaj R. Patil | Member, NSS |
| 6 | Prof. Pravin D. Kolhe | Member, Sports Section |
| 7 | Dr. Swati v. Chavan | Member, Women Section |
| 8 | Prof. Kunda V. Baviskar | Member, Student, Devlopment officer |
| 9 | Dr. Vandana S. Chaudhari | Member, NSS. |
| 10 | Mr. Mohan B. Chaudhari | Member, Admin Office |
| 11 | Neha Murlidhar Mahajan | B.Ed. Students Representative, Female |
| 12 | Shital Arun Patil | M.Ed Students Representative, Female |
| 13 | Tushar Kevaldas Patil | B. P. Ed. Students Representative, male |
| 14 | Ashok Ashok Dhangar | M.P. Ed. Students Representative |

वार्षिक सांस्कृतिक स्नेहसंमेलनात
गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार
मा. श्री. डी. टी. पाटील





वार्षिक सांस्कृतिक स्नेहसंमेलनात
गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांचा सत्कार
मा. श्री. डी. टी. पाटील

वार्षिक सांस्कृतिक स्नेहसंमेलनात मुक्त
विद्यापीठाच्या बी. एड. विद्यार्थ्यांचा
सत्कार





वार्षिक सांस्कृतिक स्नेहसंमेलनात मुक्त
विद्यापीठाच्या गुणवंत खेळाडू
विद्यार्थ्यांचा सत्कार

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, अमृत महोत्सवी वर्ष २०१९-२० जळगाव

के.सी.ई... एक प्रगल्भ शैक्षणिक चळवळ...

## Spiritual Platform To Make Golden Career..

Moolji Jaitha College
KNOWLEDGE IS POWER
ESTD. 1945

ViViDhaTa
Research & Training Center

Institute of Management & Research

स्वामी विवेकानंद
कनिष्ठ महाविद्यालय

KilBil Balak Mandir

IMPT

KCES's Ojaswini
Ojaswini Kala Mahavidhyalaya

Girls Hostel

JalaSRI Watershed Surveillance & Research Institute

एकलव्य क्रीडा संकुल
Eklavya Krida Sankul

Eklavya College of Physical Education

G. P. V. P. School

ज्ञानप्रसारो व्रतम्
स्थापना १९४४
खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी
ESTD : 1944

GICE

Orion CBSE English Medium School

S. S. Maniyar Law College

College of Education

A. T. Zamare Highschool

Orion English Medium School

Post Graduation College of Science, Technology & Research

Adhyapak Vidhyalaya (D. T.Ed)

College of Engineering & Information Technology

Spark Design & Print Services

Dr. APJ Abdul Kalam Skill Center

# KHANDESH COLLEGE EDUCATION SOCIETY

*A Profound Academic Movement*

SPARK 0257 2251918